बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड गुरुवार, दि. १७ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक७५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडींसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

### कॅनडाचे आरोप गंभीर

दिल्ली:खलिस्तानी अतिरेकी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येनंतर भारत आणि कॅनडा देशात बेबनाव निर्माण झाला. आता कॅनडामध्ये सार्वत्रिक निवडणुका जवळ येऊ लागल्यानंतर कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी या विषयाला पुन्हा एकदा हवा देऊन भारतावर बिनबुडाचे आरोप केले आहेत. यानंतर भारताने कॅनडातील उच्चायुक्तांसह सहा राजनैतिक अधिकाऱ्यांना १९ ऑक्टोबर पर्यंत भारतात परतण्याचे आदेश दिले. तसेच कॅनडाच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनाही भारतातून निघून जाण्यास सांगितले आहे. उभय देशातील नेत्यांनी जाहीरपणे यावर भाष्य केल्यानंतर आता अमेरिकेनेही यावर टिप्पणी केली असून कॅनडाचे आरोप गंभीर असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. हरदीपसिंग निज्जरच्या हत्येचा तपास करण्यासाठी भारताने कॅनडाला सहकार्य करावे, असेही अमेरिकेने सुचविले आहे.

मराठा समाजाची अंतिम निर्णय बैठक



## फडणवीसांचे नाव न घेता पाटील भडकले

# म्हणाले, मला मोठ्या डाकूला खेटायचं आहे!!



एकनाथ शिंदे यांचे पटलांकडून कौतूक | विधानसभेची प्लॅनिंग पूर्ण अपयशी करणार? | पाटील कोणती भूमिका घेणार, राज्याचे लक्ष

वडीगोद्री/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका करत राज्यातील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारवर गंभीर आरोप केले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांची राज्यातील विधानसभेची प्लॅनिंग पूर्ण अपयशी करणार असा इशारा मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी बुधवारी दिला. मला मोठ्या डाकूला खेटायचं आहे असे जाहीर करत २० ऑक्टोबर रोजी मराठा समाजाची अंतिम निर्णय बैठक आयोजित केली असल्याची माहिती जरांगे यांनी दिली.

### निर्णय झाल्यास मागे हटणार नाही

२० ऑक्टोबर रोजी अंतरवाली सराटीत होणाऱ्या बैठकीत मराठा समाजाचा पुढील राजकीय निर्णय ठरवला जाईल, आणि जर एकदा निर्णय झाला तर तो मागे घेतला जाणार नाही, असे जरांगे यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मनोज जरांगे कोणती भूमिका घेणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष आहे. काल सकाळी महायुती सरकारमधील सर्व पक्षांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यानंतर मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी संवाद साधला. जरांगे पुढे म्हणाले की, २० तारेखेच्या बैठकीत विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभा करायचे की सरकारविरोधात लढायचे याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. जरांगे यांनी इच्छुक उमेदवारांसोबत चर्चेसाठी आज अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली आहे. त्यांनी आवाहन केले की, ज्यांना शक्य आहे त्यांनी या बैठकीत उपस्थित राहावे आणि मराठा समाजाच्या भविष्यातील दिशा ठरवण्यात आपला सहभाग द्यावा.

दरम्यान, मनोज जरांगे यांनी सरकारवर टीका केली मात्र, एकमात्र एकनाथ शिंदेच मराठ्यांना आरक्षण देऊ शकतात, असे सांगितले. शिंदे यांच्या धाडसी भूमिकेचे समर्थन करत जरांगे म्हणाले की, तुम्हाला कोण काम करून देत नाही हे आम्हाला माहित नाही. मी सहा कोटी मराठ्यांना सांगितलं होतं की शिंदे साहेब आरक्षण देतील, पण अजूनही ते मिळालेलं नाही.

### मराठ्यांचे प्रमाणपत्र रोखले

देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत त्यांनी म्हटले की, फडणवीस यांनी ओबीसींमध्ये १५ जातींचा समावेश करून मराठ्यांचे प्रमाणपत्र रोखले. केसेस केल्या, ज्यामुळे मराठा युवकांना नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळवणे कठीण झाले. फडणवीस यांनी दिलेले आश्वासन फसवे ठरले. जरांगे यांनी शेतकरी कर्जमाफी आणि नुकसानीच्या भरपाईच्या मुद्द्यांवरही सरकारवर टीका केली. शेतकऱ्यांना मिळालेल्या वाईट वागणुकीबद्दल त्यांनी सरकारला धारेवर धरले. तुम्हाला आमचे मुडदे बघायची सवय लागली आहे, असे म्हणत त्यांनी सरकारविरोधातील असंतोष व्यक्त केला.

## दिलीप जगदाळेंना IAS संवर्गात बढती

### अभिनंदनिय: बीडमध्ये जात पडताळणी विभागात अध्यक्ष म्हणून कामकाज

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मौजे बुध ता खटाव येथील दिलीप जगदाळे यांना नुकतीच IAS पदावर बढती मिळाली आहे. जगदाळे हे सध्या महाराष्ट्र शासनाचे शिक्षण सहसंचालक म्हणून कार्यरत आहेत. केंद्र शासनाचे मनुष्यबळ व प्रशिक्षण विभागातर्फे नुकतेच या बाबतचे गॅजेट राजपत्र जाहीर करण्यात आले आहे.यावर्षी महाराष्ट्राच्या राज्य शासकीय नागरी सेवेतील तेवीस अधिकाऱ्यांना IAS संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. यामध्ये श्री जगदाळे यांचाही समावेश आहे.जगदाळे यांनी त्यांचे शिक्षण नागनाथ विद्यामंदिर, दापोली व राहुरी कृषी विद्यापीठ , कर्मवीर



पाटील मॅनॅजमेण्ट इन्स्टिटयूट सातारा, पुणे विद्यापीठ व सिम्बायोसिस विद्यापीठ येथून शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी यापूर्वी श्रीवर्धन व देवगड येथे तहसीलदार पदावर काम केले आहे. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग व पंढरपूर येथे त्यांनी प्रांताधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी निभावली आहे. पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे कार्यकारी पद त्यानी काही काळ भूषविले आहे. तेथे सर्वसामान्य भाविक व सारकारी यांचे प्राथमिक सोयीसुविधा व मंदिर अंतर्गत व्यवस्था यांचे विकासावर त्यांनी भर दिला होता. अपर जिल्हाधिकारी पान २ वर...

## 'त्या' जीआरवर कारवाई करु

### अडचणीत: निवडणूक आयोगाचा इशारा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांना एक महत्त्वाचा प्रश्न पत्रकारांनी विचारला. राज्य सरकारने आचारसंहिता जाहीर केल्यानंतर एखाद्या योजनेचा जीआर काढला असेल तर कारवाई कराल का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर चोकलिंगम यांनी स्पष्ट भूमिका मांडली.राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी



आपल्या इतर सहकाऱ्यांसह पत्रकार परिषद घेतली. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून काल महाराष्ट्र विधानसभेची घोषणा करण्यात आली. यानंतर आज राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत निवडणुकीविषयी महत्त्वाची माहिती दिली. यावेळी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांना एक महत्त्वाचा प्रश्न पत्रकारांनी विचारला. राज्य सरकारने आचारसंहिता जाहीर केल्यानंतर एखाद्या योजनेचा जीआर काढला पान २ वर...

## काळा पैसा वापरला जात असल्याचा माहिती द्यावी!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये काळा पैसा वापरला जात असल्याची माहिती, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल याबाबत विश्वसनीय माहिती असल्यास ती नि:संकोच पणे द्यावी, असे आवाहन नागपूरच्या आयकर प्रधान संचालक कार्यालयाचे आयकर उपसंचालक (तपास) अनिल खडसे यांनी केले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

माहिती पाठविण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-०३५५, १८००-२३३-०३५६, छायाचित्रे, व्हिडिओ इत्यादी पाठविण्यासाठी व्हाटसअप क्र. ९४०३३९०९८०, इमेल nagpur.addldit.invincometax.gov.in, nashik.addldit.invincometax.gov.in आहेत. निवडणुकी दरम्यान काळ्या पैशांचा वापर रोखण्यासाठी प्राप्तीकर विभागास सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

## शेतकऱ्यांनी घातला सरकारचा चौदावा

### किसान सभा :विधासभेत सरकारला देणार मूठ-माती



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयाबीन खरेदीकेंद्र चालू करून,कापूस आणि सोयाबीनहमीभावाच्या किंमतीत खरेदी करा, सरकारने घोषित केलेले अनुदान तात्काळ शेतकऱ्यांना द्या, रब्बी-खरीप विमा तात्काळ शेतकऱ्यांना द्या, चारशे कोटीचा विमा कोणाला दिला याच्या याद्या प्रकाशित करा,भौगोलिक परिस्तिथी पाहता जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सातबारा कोरा करा या मागाण्यांना घेऊन तेलगाव येथे दसऱ्यात दहा दिवस धरणे आंदोलन करून सुद्धा शेतकरी प्रश्नांना दुर्लक्ष करणाऱ्या सरकार आणि प्रशासनाच्या नावे मुंडन करून दहावा केला व किसान सभेच्या नेतृत्वात शेकडो शेतकरी गेल्या तीन दिवस पायी प्रवास करत तेलगाव ते बीड पायी चालत आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढून सरकारचा चौदावा घातला. गोड जेवणाचा कार्यक्रम म्हणून श्यामसुंदर महाराज यांचे किर्तन सुद्धा करण्यात आले.

यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री,जिल्हाधिकारी व जिल्हाप्रशासन, सरकार यांच्या विरोधात पान २ वर...

### निर्णय — तलवारऐवजी आता हातात संविधान

# न्यायदेवतेच्या मूर्तीमध्ये बदल!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या सूचनेवरुन न्यायदेवतेत बदल करण्यात आले आहेत. न्यायदेवतेच्या हातात आधी तलवार होती. पण हे हिंसेचे प्रतीक आहे, असे सीजेआयचे मत आहे त्यामुळे, न्यायालये हिंसाचाराद्वारे न्याय देत नाहीत तर घटनात्मक कायद्यांनुसार न्याय देतात. म्हणून दुसऱ्या हातातील तलवार ऐवजी हातात संविधान देण्यात आले आहे.चित्रपटात अनेक दृश्यांमध्ये तुम्ही पाहिले असेल की, न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी होती. एका हातात तराजू होता आणि एका हातात तलवार होती. जी बदलून आता हातात संविधान असेल. काही काळापूर्वी ब्रिटीश कायद्यात बदल करण्यात आले आहेत. भारतीय न्यायव्यवस्थेनेही ब्रिटीशांचा काळ मागे टाकून नवे स्वरूप स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने फक्त प्रतीकच बदलले नाही. तर पान २ वर...

### ब्रिटिश अधिकाऱ्याने हा पुतळा भारतात आणला

हा पुतळा ग्रीसमधून ब्रिटनला पोहोचला. १७ व्या शतकात ब्रिटीश अधिकाऱ्याने तो पहिल्यांदा भारतात आणला होता. हा ब्रिटिश अधिकारी कोर्ट ऑफिसर होता. १८ व्या शतकात ब्रिटीश काळात न्याय देवीची मूर्ती सार्वजनिक वापरात आणली गेली. पुढे देश स्वतंत्र झाल्यावर आपणही न्यायदेवतेचा स्वीकार केला



### न्यायदेवतेची मूर्ती भारतात कोठून आली?

न्यायाची देवी ही एक प्राचीन ग्रीक देवी आहे, जी न्यायाचे प्रतीक असल्याचे म्हटले जाते. तिचे नाव जस्टीया आहे. तिच्या नावावरून न्याय हा शब्द तयार झाला. या देवीच्या डोळ्यांवर बांधलेल्या पट्टीचाही खोल अर्थ आहे. डोळ्यावर पट्टी बांधली जाणे म्हणजे न्यायदेवता नेहमी नि:पक्षपातीपणे न्याय देईल. एखाद्याकडे पाहून त्यांना न्याय देणे एका दिशेने जाऊ शकते. त्यामुळे त्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधली गेली होती.

### तलवार हिंसा आणि तराजू समानतेचे प्रतीक

तलवार हे हिंसेचे प्रतीक आहे, असे सीजेआय यांचे मत होते. तर, न्यायालये हिंसाचाराद्वारे न्याय देत नाहीत तर घटनात्मक कायद्यांनुसार न्याय देतात. त्यामुळे दुसऱ्या हातात तलवार ऐवजी संविधान असावे जो प्रत्येकाला समान न्याय देतो.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या सूचनेनुसार न्यायदेवतेची मूर्ती बदलण्यात आली आहे. सर्वप्रथम जजेस लायब्ररीमध्ये मोठा पुतळा बसवण्यात आला आहे. येथे न्यायदेवतेचे डोळे उघडे आहेत आणि पट्टी नाही, तर तिच्या डाव्या हातात तलवारीऐवजी संविधान आहे. उजव्या हाताला पूर्वीप्रमाणेच तराजू आहे.

## आदर्श आचारसंहितेचे पालन व्हावे

### अरविंद लाटकर: परळीत ३ लाख ३५ हजार ९५४ मतदार

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ ची केंद्रीय निवडणूक आयोगाने घोषणा केल्यानंतर २३३ विधानसभा मतदारसंघातील तयारी बाबत उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी आज पत्रकार परिषद घेतली. परळी विधानसभा मतदारसंघातील ३ लाख ३५ हजार ९५४ मतदार परळीचा भावी आमदार कोण हे ठरविणार आहेत. निवडणूक काळात सर्वच राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन २३३ विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी केले.



परळी येथे उपविभागीय कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीबाबत पत्रकारांना माहिती दिली. विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख ३५ हजार ९५४ मतदार आहेत .त्यापैकी एक लाख ७५ हजार १८४ पुरुष तर एक लाख ६० हजार ७६६ स्त्री मतदार आहेत.

निवडणुकीसाठी एकूण ३६३ मतदान केंद्रे बनविण्यात आले आहेत .त्यापैकी परळी शहर ८८ , परळी तालुका २५८ तर अंबाजोगाई तालुक्यातील १०५ मतदान केंद्रांचा समावेश आहे. मतदारसंघातील केंद्र क्रमांक २२२ वसंत नगर, केंद्र क्रमांक २४१ पिंपळा धायगुडा,केंद्र क्रमांक २४२ पिंपळा धायगुडा,केंद्र क्रमांक २४३ पिंपळा धायगुडा, केंद्र क्रमांक २२३ मलकापूर, केंद्र क्रमांक २६३ गुट्टेवाडी, केंद्र क्रमांक २२७ नंदनज ,केंद्र क्रमांक २६ पाडोळी, केंद्र क्रमांक ८८ भादूरवाडी ,केंद्र क्रमांक २७ औरंगपूर, केंद्र क्रमांक २२६ पान २ वर...

## कडवटपणाची वेळ आली

जवळपास अर्धा डझनभर मुत्सद्द्यांची परस्परांच्या राजधानीतून हकालपट्टी आधुनिक जगात केली जाते, जेव्हा दोन देश परस्परांशी युद्धाच्या समीप असतात. किंवा, एका देशाने दुसऱ्या देशाच्या हद्दीत एकतर्फी लष्करी घुसखोरी करून त्या देशाचे ऐक्य आणि सार्वभौमत्व धोक्यात आणलेले असते. भारत आणि कॅनडा यांच्यादरम्यान असे काहीही घडलेले नाही किंवा संभवतही नाही. तरीदेखील अत्यंत टोकाच्या राजनैतिक साठमारीत दोन्ही देश गुंतलेले आहेत. हरदीपसिंग निज्जर या शीख विभाजनवाद्याच्या हत्येमध्ये भारतीय उच्चायुक्तांचाही अप्रत्यक्ष सहभाग होता असा खळबळजनक, काहीसा बेजबाबदार आरोप कॅनडाने केल्यामुळे भारत सरकार संतप्त होणे स्वाभाविक आहे. राष्ट्रकुल देशांच्या रचनेत उच्चायुक्त म्हणजे सर्वोच्च राजदूतच. अशा व्यक्तीवर एका सर्वसामान्य नागरिकाच्या खूनप्रकरणी ठपका ठेवणे तसे धार्ष्ट्याचेच. भारतीय उच्चायुक्त संजय वर्मा यांची निज्जरप्रकरणी चौकशी करण्यासाठी प्रथम त्यांना असलेले राजनैतिक संरक्षण काढून घेण्याची संमती भारताकडून यावी लागणार होती. ती देण्यास अर्थातच भारताने नकार दिल्यामुळे वर्मा यांना कॅनडा सोडून जाण्याविषयी फर्मावण्यात आले. म्हणजे या मुत्सद्दी हकालपट्टी सत्राची सुरुवात कॅनडाकडून झाली. गेल्याच आठवड्यात 'आसिआन' परिषदेच्या निमित्ताने लाओस येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची भेट झाली होती. त्या भेटीचा वृत्तान्त दोन देशांनी ज्या प्रकारे सादर केला, ती विद्यमान कडवटपणाची नांदी ठरली. ट्रुडो यांनी मोदींशी महत्त्वाच्या विषयांवर आणि निज्जर तपासावरही चर्चा केल्याचे म्हटले. मोदी त्या भेटीविषयी काहीच बोलले नाहीत. त्यांच्या वतीने भारताच्या परराष्ट्र खात्याने निवेदन प्रसृत केले आणि कॅनडाचे सरकार शीख विभाजनवाद्यांना वेसण घालत नाही, तोवर सकारात्मक चर्चा असंभव असे ठामपणे सांगितले गेले. तेव्हा दोन राष्ट्रप्रमुख समक्ष भेटूनही हा तिढा सुटणारा नाही, हे स्पष्टच. पण याचे अनेक कंगोरे आहेत आणि म्हणूनच कोणा एका देशास थेट जबाबदार धरण्याची निसरडी वाट टाळणे शहाणपणाचे ठरेल. सर्वप्रथम कॅनडाविषयी. त्या देशात पुढील वर्षी सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्यात पंतप्रधान ट्रुडो यांच्या लिबरल पार्टीला यश मिळण्याची शक्यता सध्या तरी फार कमी दिसते. घरांच्या चढ्या किमती हा त्यांच्या विरोधात मतदारांच्या रोषाचा प्रमुख मुद्दा आहे. राजकीयदृष्ट्या त्यांच्या पायाखालील जमीन सरकू लागली आहे. गेल्या महिन्यात न्यू डेमोक्रॅटिक पार्टी या पक्षाने त्यांच्या आघाडीतून माघार घेतली. याची नोंद आवश्यक. कारण या न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचा नेता जगमीत सिंग हा उघडपणे 'खलिस्तान'च्या मागणीचे समर्थन करत आला आहे. पराकोटीचा भारतविरोध हे त्याच्या पक्षाचे आणखी एक लक्षण. त्याच्यासारख्या विभाजनवाद्यांची तळी उचलूनही जगमीतला सत्तारूढ आघाडीत कायम ठेवण्यात ट्रुडो अपयशी ठरले. कॅनडात गेल्या चार महिन्यांत झालेल्या दोन पोटनिवडणुकांमध्ये लिबरल पार्टीचा पराभव झाला. त्यातील एक निवडणूक तर ट्रुडो यांच्या 'घरात'ली म्हणजे मॉँट्रिअल शहरातील, जेथे त्यांचा पक्ष आधी कधीच पराभूत झाला नव्हता. दुसरी पोटनिवडणूक टोरान्टो शहरातील. हे निकाल म्हणजे पुढील वर्षी ट्रुडोंच्या पक्षासाठी काय वाढून ठेवले आहे, याची झलकच. त्यामुळे जस्टिन ट्रुडो हे राजकीयदृष्ट्या अस्थिर बनले आहेत. त्यांनी सोमवारी जाहीरपणे भारताला दूषणे दिली. त्यामागे ही राजकीय अस्थिरता असावी. तसाच प्रकार त्यांनी गतवर्षी सप्टेंबर महिन्यात केला होता. दोन्ही वक्तव्यांच्या वेळांमागे एक संगती दिसते. गतवर्षी ट्रुडो जी-ट्वेन्टी परिषदेच्या निमित्ताने भारतात मोदींना भेटले होते. यंदा आसिआन परिषदेत मोदी-भेट घडून आली. दोन्ही भेटींनंतर काही अवधीतच ट्रुडो यांची आरोपपाखड झाली. म्हणजे या भेटींमध्ये ट्रुडोंना अपेक्षित काही होते, ते मिळाले नसावे. कारण सहसा इतक्या अलीकडे झालेल्या भेटींनंतर परिपक्व नेते अशा प्रकारची वक्तव्ये संबंधित देशांविषयी करत नसतात. पण परिपक्वतेशी ट्रुडो यांचा संबंध नाही हे वेळोवेळी दिसून आले आहेच. ते वरचेवर चीनवरही आरोप करत असतात. चीन आणि भारत या देशांनी कॅनडात हस्तक्षेप सुरू केल्याची वक्तव्ये त्यांनी केलेली आहेत. राजकीयदृष्ट्या अस्थिर नेत्याकडून अशा प्रकारे मतदारांचे लक्ष दुसरीकडे, विशेषत: 'राष्ट्रीय सुरक्षे'च्या मुद्द्याकडे वळवणे हे प्रारूप सर्वव्यापी आणि सुपरिचित बनले आहे. कॅनडासारख्या संसाधनसमृद्ध, सधन आणि लोकशाहीप्रधान देशाच्या नेत्यासही निवडणूक जिंकण्यासाठी अशा प्रकारच्या कसरती कराव्या लागतातच. ट्रुडो तेच करत आहेत. त्यांचे निज्जरसंदर्भातले आरोप मतपेढीच्या राजकारणाने प्रेरित आहेत, असे भारताने म्हटले आहे. ते रास्तच. पण निव्वळ आरोप करून आपली जबाबदारी संपत नाही.यांपैकी काहीच न केल्यामुळे मुत्सद्द्यांच्या हकालपट्टीची आणि हाताबाहेर गेलेल्या कडवटपणाची वेळ आली. हा ''कॅनडा'ऊ ट्रुडोऊ'' बराच काळ आपल्यासाठी कटकटाऊ ठरणार, असे दिसते.

# पाल्याला वाचनाची गोडी निर्माण करावी

## प्रा.डॉ.उत्तम साळवे : वाचन प्रेरणा दिन उत्साहात



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जगात पुस्तक प्रेमी असलेल्या दोन महान व्यक्तीपैकी प्रचंड वाचन व्यासंगातून मिळालेल्या ज्ञानामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' (ज्ञानाचे प्रतीक) म्हणून ओळखल्या जाते. तर भारताचे थोर शास्त्रज्ञ माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. या थोर महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पालकांनी लहानपणीच आपल्या मुलांना वाचनाची गोडी निर्माण करावी असे प्रतिपादन प्रा.डॉ. उत्तम साळवे यांनी केले. त्यांच्या हातात विज्ञानवादी दृष्टीकोन असलेली, थोर महापुरुषांच्या जीवन चरित्राची पुस्तके देशभक्तीपर पुस्तके दिली पाहिजेत जेणेकरुन आपले पाल्य अनिष्ट रुढी परंपरा, अंधश्रध्देपासून दूर राहतील. वाचन म्हणजे केवळ करमणूक म्हणून केवळ पुस्तक वाचन नव्हे तर वाचन, मनन, चिंतन यातून वर्तनात होणारा बदल होय असे स्पष्ट करुन वाचनाचे प्रेरक स्तोत्र असलेले डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन व विद्यार्थ्यांशी सतत असलेल्या संवादाबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रेरणादायी पुस्तक एखाद्याच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवू शकते, हे भिमरावांना त्यांच्या सत्कार प्रसंगी गुरुवर्य केळूसकर गुरुजी लिखित गौतम बुध्दाचे जीवन चरित्र पुस्तक भेटीच्या प्रसंगाबद्दल माहिती दिली. डॉ.बाबासाहेबांचे 'वाचाल तर वाचाल' या बहुमोल उपदेशाची आठवण करुन दिली.

महामानव सार्वजनिक वाचनालय व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने बोधीसत्व बुध्दविहार इंदिरा नगर बीड येथे डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमाने संपन्न केला. मुलांना 'वाचाल तर वाचाल' फिरते मोफत वाचनालयातर्फे ६ व्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच वाचण्याकरीता कार्यक्रमाचे अध्यक्ष डी. जी.वानखेडे व प्रमुख पाहुणे स्वा.सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.उत्तम साळवे व प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. पुस्तक वितरणाची जबाबदारी उपासक अशोक साळवे यांनी स्विकारली. सर्वप्रथम तथागतांना पुष्प, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या प्रतिमेस पुष्प,पुष्पमाला अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, भा.बौ.महासभा ता.अध्यक्ष राजेंद्र ससाणे व प्रा.बबीता गायकवाड,प्रा. डॉ.शिवाजीराव दीवाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी.एम.भोले यांनी केले तर सुत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे व प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड यांनी त्यांची कन्या कु.सांचीचा वाढदिवस गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना महामानव अभिवादनग्रुपच्या वही-पेन वाटप अभियानांतर्गत ६० विद्यार्थ्यांना रजिस्टर, वही,पेन (शालेय साहित्य) वाटप करुन साजरा केला. या पुढे देखील गरजू विद्यार्थ्यांकरीता मदत करण्याचे ठोस आश्वासन दिले. महामानव अभिवादन ग्रुपने कु.सांचीचा डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्राचे पुस्तके वाचन प्रेरणा वृध्दी करीता भेट दिली. या प्रसंगी प्राचार्य गायकवाड व प्रा.बबीता गायकवाड यांनी मुलांना वाचन संस्कृती वाढीसाठी बहुमोल उपदेश अनेक उदाहरणाद्वारे सोप्या भाषेत समजावून सांगितले. भिमरायांच्या जीवनावर अंजली घडसिंगे, अनुष्का लोणके, संबोधी वीर व प्रतिज्ञा घाडगे या विद्यार्थीनींनी 'चांदन्याची छाया, कापराची काया, माऊलीची माया होता माझा भिमराया' हे भावस्पर्शी गीत सुरेल आवाज गावून सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्या सर्वांचा महापुरुषांची जीवन चरित्रे पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेकरीता कॅप्टन राजाभाऊ आठवले, प्रा.अशोक गायकवाड यांनी बहुमोल परिश्रम घेतले. कार्यक्रमास गौतम जावळे, वीजुबाई वीर, बेबी साळवे, सुमित्रा ससाणे, जया साळवे, लक्ष्मीबाई वीर, कुसूम वीर, सोमाबाई बनसोडे व परिसरातील बहुसंख्य पालकांची व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. वाचनालयातर्फे मुलांना अल्पोपहार देवून सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्याम मानव यांच्या कार्यक्रमात गोंधळ

## प्रकार:भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी घातला गोंधळ



नागपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे बुधवारी नागपूर येथे प्रा. श्याम मानव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमा दरम्यान व्याख्यानस्थळी भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. त्यामुळे कार्यक्रमात व्यत्यय आला होता. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे सुरेश भट सभागृहात सायंकाळी ६ वाजता प्रा. शाम मानव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'संविधान बचाओ-महाराष्ट्र बचावो' हा श्याम मानव यांच्या व्याख्यानाचा विषय होता. सध्याची राजकीय स्थिती, लाडकी बहीण योजना, महाराष्ट्रातील बेरोजगारी, उद्योग गुजरातला जाणे, संविधानाचे रक्षण करण्यासाठ उपाय, महाराष्ट्रातील पोलिसांची अवस्था, आरक्षणाचे काय होणार इत्याती विषयांवर श्याम मानव आपली भूमिका या व्याख्यानात मांडणार होते.सायंकाळी ६ वाजता कार्यक्रम होता. मात्र त्यापर्वीच श्रोत्यांची गर्दी सभागृहात होऊ लागली होती. या श्रेत्यांमध्येच भारतीय जनता युवा मोर्चेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. व्याख्यान सुरू झाल्यानंतर श्रोत्यांमध्ये बसलेल्या भाजयुमोच्या कार्यकर्त्याने श्याम मानव यांना संविधानाच्या संदर्भात प्रश्न विचारला. २०१४ नंतर आतापर्यंत किती वेळा संविधानात बदल करण्यात आला, असे त्यांना विचारले. मात्र श्याम मानव यांनी त्याला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी घोषणा देणे सुरू केले. त्यामुळे सभागृहात एकच गोंधळ उडाला. भाजयुमोचे कार्यकर्ते व्यासपीठीवर जाऊन घोषणा देत होते. त्यावेळी श्याम मानव त्यांच्या खुर्चीवर शांतपणे बसून होते.यासंदर्भात श्याम मानव म्हणाले. अशा प्रकारच्या गोंधळाची मला सवय आहे, त्यामुळे मी विचलीत झालो नाही. माझे भाषण पूर्ण मी करणारच आहे. गोंधळाला मी भिक घालत नाही.

### सभागृहात पोलिसांचा तगडा बंदोबस्त

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव यांचे जाहीर व्याखान असल्यामुळे पोलिसांनी कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून तगडा बंदोबस्त ठेवला होता. कार्यक्रमादरम्यान कोणताही गोंधळ किंवा तणाव होऊ नये यासाठी पोलिसांनी पोलीस कर्मचारी तैनात केले होते. भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम सुरु होण्यापूर्वीच विरोध दर्शविला. त्यामुळे एकच खळबळ उडून तणावाची स्थिती निर्माण झाली. पोलिसांचा मोठा ताफा भट सभागृहात तैनात करण्यात आला आहे.

## पान एक वरून

**दिलीप जगदाळेंना**

असताना त्यांनी सरदार सरोवर नंदुरबार, धुळे अपर जिल्हाधिकारी व बीड जात पडताळणी अध्यक्ष या पदांवर काम केले आहे. नंदुरबार येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व धुळे येथील कोविड काळात जगदाळे यांनी उल्लेखनीय कामगिरी केलीआहे. राज्याच्या विविध प्रांतातील ९ जिल्ह्यामध्ये एकूण ३३ वर्षे कामाचा प्रदीर्घ अनुभव त्यांचेकडे आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, शिक्षण संशोधन संचालक राहुल रेखावर, संचालक शरद गोसावी, संपत सूर्यवंशी इ. नी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**'त्या' जीआरवर कारवाई**

असेल तर कारवाई कराल का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर चोकलिंगम यांनी स्पष्ट भूमिका मांडली. राज्यात आचारसंहिता लागल्यानंतर जीआर काढता येत नाही. याबाबत आम्ही आधीच सूचना दिली होती. दुपारी साडेतीन वाजल्यानंतर सरकारकडून जीआर टाकले गेले असतील तर चौकशी करून कारवाई करू, असं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांनी सांगितलं.विधानसभेच्या २८८ आणि नांदेड लोकसभेसाठी १ जागेची पोटनिवडणूक होणार आहे. दिवाळीची सुट्टी असल्याने अर्ज मागे घेण्याची तारीख पुढे वाढवली आहे. कालपासून राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. जिल्हा पातळीवर कारवाईचे पथक तैनात आहे. आचारसंहितेचा भंग होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यास १०० मिनिटात कारवाई होईल. १९ तारखेपर्यंत तुम्ही मतदार यादीत नाव टाकू शकतात. मुंबईत लोकसभा निवडणुकीत अनेक ठिकाणी मोठी गर्दी झाली होती. अशा मतदान केंद्रावर योग्य व्यवस्था केली जाईल, अशी माहिती एस. चोकलिंगम यांनी दिली.

**'तर योग्य कारवाई केली जाईल' :** निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनीदेखील यावेळी प्रतिक्रिया दिली. ज्या बदल्या शिल्लक होत्या त्या करण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने स्पष्ट केलं आहे, असं किरण कुलकर्णी यांनी सांगितलं. पिपाणीबाबत निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने दिला आहे. तुतारी आणि पिपाणी आजूबाजूला असणार का? हे आता सांगता येणार नाही. हे उमेदवारांच्या क्रमवारीनुसार असेल. दिवाळीमध्ये मतदारांना प्रलोभन दिलं गेलं तर योग्य कारवाई केली जाईल, असा इशारा निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी दिला.

**शेतकऱ्यांनी घातला सरकारचा**

घोषणाबाजी करण्यात आली.आम्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या सरकारला येत्या विधानसभा निवडणुकीत चारीमुंड्याचित्त करण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला.यावेळी माजी न्यायाधीश बाबुराव तिडके, विठ्ठल लगड दादा यांनी पाठिंबा दिला. किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अजय बुरांडे,मुरलीभाऊ नागरगोजे,दत्ता काका डाके,काशीराम सिरसाट,जगदीश फरताडे,भगवान बडे यांनी शेतकऱ्यांच्या वेदना मांडणारे मनोगत व्यक्त केले.श्यामसुंदर महाराज यांच्या किर्तनातून शेतकऱ्यांनो लढा सोडू नका या संदेशाने या धडक आंदोलनाचा शेवट करन्यात आला.

**न्यायदेवतेच्या मूर्तीमध्ये**

न्यायदेवतेने वर्षानुवर्षे डोळ्यावर बांधलेली पट्टीही काढून टाकली आहे.सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी यासाठी प्रयत्न केले होते. त्यांच्या सूचनेवरून न्यायदेवतेत बदल करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वाचनालयातही असाच पुतळा बसवण्यात आला आहे. आधी न्यायदेवतेची मूर्ती असायची त्याच दोन्ही डोळ्यांवर पट्टी बांधली होती. तसेच, एका हातात तराजू तर दुसऱ्या हातात तलवार होती. जी शिक्षेचे प्रतीक आहे.

**आदर्श आचारसंहितेचे...** कासारवाडी ,केंद्र क्रमांक १०५ सोनहिवरा या १२ केंद्रांचा संवेदनशील मतदान केंद्रे म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. २३३ विधानसभा मतदारसंघासाठी २२ ऑक्टोबर रोजी अधिसूचना प्रकाशित होईल. २९ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ३० ऑक्टोबर रोजी छाननी होईल. ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबर रोजी मतदान होईल तर २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात येईल. विधानसभा निवडणुकीत उभे राहू इच्छिणाऱ्या सर्वसाधारण उमेदवारांना १० हजार रुपये अनामत रक्कम तर मागासवर्गीय अनुसूचित जाती आणि जमातीच्या उमेदवारांना ५ हजार रुपये भरावे लागणार आहेत. दरम्यान सर्व उमेदवारांसाठी निवडणूक काळात आवश्यक परवाने काढण्यासाठी तहसील कार्यालयात एक खिडकी योजना सुरू करण्यात येणार असून येथेच सर्व परवाने नियमानुसार उपलब्ध करून देण्यात येतील. या पत्रकार परिषदेला उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार व्यंकटेश मुंडे, दुसरे सहाय्यक निवडणूक अधिकारी मुख्याधिकारी नगरपरिषद कांबळे, तर तिसऱ्या सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून तेजस्वी जाधव काम पाहणार आहेत. यावेळी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नायब तहसीलदार परवेज पठाण मॅडम, निवडणूक विभागातील अण्णासाहेब वंजारी साहेब, मिलिंद गायकवाड आदी उपस्थित होते.

## पान सहा वरून

**माजलगावचा कुस्ती**

प्राचार्य,क्रीडा विभागाचे प्राध्यापक श्री आवारे सर, पुणे येथील प्रशिक्षक, वस्ताद व आई वडील यांच्यासह तालुक्यातील सर्वसामान्य लोकांसह जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

**केज मतदार संघात प्रश्नांचा**

भोगवटा धारक गावठाण धारक आज घरकुल पासुन अक्षरशा ते आज वंचित राहिलेले आहेत हा एवढा सोपा प्रश्न असतानाही आमदार महोदय यांना हा प्रश्न हाताळणे गांभीर्याची वाटले नाही यामुळे किती कुटुंब आज घरा विना बेगर आहेत आणि पक्क्या घरापासून वंचित आहेत केज मतदारसंघ गेल्या ४० वर्षापासून राखीव असतानाही या ठिकाणी एकही मतदारसंघांमध्ये मागासवर्गीय म्हनावा त्या प्रकारे कोणताही विकास नाही मतदारसंघातील काही गावांना मागासवर्गी वस्ती ना आज ही पक्के रस्ते नाहीत मागासवर्गीय वस्त्यांमध्ये आजही लाईट नाही त मागासवर्गीय असूनही मागासवर्गीयांचा प्रश्न विधानसभेमध्ये न मांडणाऱ्या या आमदार म्हणून आज महाराष्ट्र मध्ये गणल्या जात आहेत आज केज मतदारसंघांमधील मागासवर्गीय लोक केज मतदारसंघ राखीव आहे का नाही असे बोलू लागले आहेत.

**पत्रकारला संरक्षण देण्यासाठी**

मुंदडा व त्यांच्या कार्यकर्त्यांन कडुन जिवीतास धोका असल्याने बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ यांनी पोलिस अधीक्षक यांना मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील समर्थक पत्रकार रोहन गलांडे पाटील यांना संरक्षण देण्यासाठी पत्रा द्वारे मागणी केली आहे.तरी रोहन गलांडे पाटील यांनी खासदार बजरंग सोनवणे यांचे आभार मानले आहेत.

**आशियाई मिनी गोल्फ**

सिंग, ईशा फुलबांदे, इशिका हनवंत या खेळाडूंचा समावेश होता. प्रांजलीने नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मिनी गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक, तर ३७ व्या राष्ट्रीय मिनी गोल्फ स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करताना रौप्यपदकदेखील पटकाविले होते. प्रांजलीच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. अनंत चक्रदेव, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, स्कूल ऑफ बायो इंजिनिअरिंगच्या अधिष्ठाता डॉ. रेणू व्यास, क्रीडा विभागाचे संचालक प्रा. पद्माकर फड यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

**जखमी झालेल्या शेतकऱ्याचा**

आले होते, परंतु मंगळवारी( दि.१५) रात्री अकरा वाजता त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे त्यांचेवर घाटी रुग्णालयात शवविच्छेदन करून बुधवार( दि.१६) सायंकाळी पाच वाजता निंबायती गावात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी,दोन मुले एक मुलगी असा परिवार आहे.

**हडपसर विधान सभेसाठी**

पुण्यातील हडपसर मतदारसंघ जागा युतीच्या जागावाटपात कळीचा ठरत असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे आघाडीत देखील या जागेवरून ओढाताण सुरु आहे. भाजपा-सेनेत हडपसरवरून असा तिढा निर्माण झाला असताना आघाडीतही काही आलबेल नाही. हडपसरची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस लढणार असल्याचं अजित पवार यांनी आधीच जाहीर केलंय. कॉंग्रेसच्या स्थानिक नेत्यांना हा निर्णय मंजूर नाही. ही जागा कॉंग्रेसला मिळावी यासाठी गरज पडल्यास मोर्चा काढण्याची तयारी इथल्या इच्छुकांनी चालवलीय. तेव्हा युती असो वा आघाडी विधानसभेसाठीचं जागावाटप ही दोन्हीकडची डोकेदुखी आहे. ही प्रक्रिया जितकी सहजतेनं पार पडेल तितकं दोघांसाठी फायद्याचं आहे. मात्र जेव्हा प्रश्न इच्छुकांच्या मनसुब्यांचा येतो तेव्हा अशा तिढ्यातून मार्ग काढणं पक्षाच्या नेत्यांसमोर मोठं आव्हानांचं असतं.

**सर्व मतदारांनी मताचा**

महिला मतदार आहेत. तृतीय पंथी मतदार २३ आहेत.या मतदारांमध्ये दिव्यांग मतदार नऊ हजार २७२ आहेत. ज्यामध्ये पाच हजार ९८४ पुरूष, तीन हजार २८८ महिला मतदार आहेत. वय वर्ष ८५ हून अधिक मतदार ३८ हजार १४० आहेत, ज्यामध्ये १५ हजार ५२० पुरूष, २२ हजार ६२० महिला आहेत. यासह संवेदनशील मतदान केंद्रे, बॅलट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट, पोलिस पथके, निमलष्करी पथके, स्थिर पथके आदींची माहितीही श्री. पाठक यांनी दिली. या माहितीसह आवश्यक त्याप्रमाणात पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचेही श्री. पाठक यांनी यावेळी पत्रकारांना सांगितले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्यावतीने संकलित करण्यात आलेल्या निवडणुकीशी संबंधित आवश्यक माहितीची संदर्भ पुस्तिकाही उपस्थित पत्रकारांना देण्यात आली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# आचारसंहिता लागल्याने पंचनाम्यांना खोडा!

## चिंता शेतकऱ्यांना अतिवृष्टीच्या नुकसानिची प्रतिक्षा



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुका आणि त्यासाठी जाहीर झालेली आचारसंहिता यामुळे अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची पंचनामे अद्यापही रेंगाळली आहे आचारसंहिता सुरू होताच बुधवार पासून निवडणुकांच्या पूर्वतयारी साठीच्या प्रशासकीय पातळीवर अधिकाऱ्यांच्या बैठका आणि नियोजन दौरे सुरू झाले आहे त्यामुळे मनुष्यबळ अभावी सोयगाव तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पंचनामे रेंगाळली आहे

बनोटी आणि जरंडी या दोन्ही मंडळांना रविवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे या दोन्ही मंडळात कपाशी व मका पिकांची मोठे नुकसान झाले आहे मात्र अद्यापही या नुकसानीच्या प्राथमिक अहवाल जिल्हाप्रशासनाकडे सादर झालेला नव्हता त्यामुळे बनोटी आणि जरंडी या दोन्ही मंडळातील शेतकऱ्यांना पंचनाम्याची प्रतीक्षा लागून आहे रविवारी रात्री बनोटी मंडळात ७० मिनिटात ४३ गावात १०० मी मी पावसाने शतकी आकडेवारी गाठली आहे त्यामुळे या भागातील ४३ गावांना फटका बसला आहे दरम्यान शासनाच्या निकषाप्रमाणे एकाच दिवसात शंभर मी मी पाऊस झाल्यास त्या मंडळात ओला दुष्काळ जाहीर करण्याची निकष आहे त्यामुळे शासन निर्णयाप्रमाणे बनोटी मंडळ ओल्या दुष्काळ च्या छायेत आहे परंतु आगामी निवडणुका आणि आचारसंहिता जाहीर झाल्याने या हालचाली ठप्प झाल्या आहे निवडणूक साठी महसूल पंचायत आणि कृषी चे अधिकारी व कर्मचारी नियुक्त झाले आहे त्यामुळे नुकसानीची पाहणी व पंचनामे करण्यासाठी तालुका प्रशासनाकडे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने पंचनामे ठप्प झाले असून प्राथमिक नुकसानीचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे अद्यापही सादर झालेला नाही त्यामुळे यंदाच्या मदतीपासून शेतकऱ्यांना मुकावे लागणार आहे

### तालुका कृषी अधिकाऱ्याचीही बदली

दरम्यान आचारसंहिता जाहीर होण्याच्या आत सोयगाव चे तालुका कृषि अधिकारी मदन सिसोदिया यांचीही बदली झाल्याने पुन्हा अडचणी चा डोंगर उभा राहिला आहे त्यामुळे बुधवार पासून तालुका कृषी विभाग प्रभारी तालुका कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांच्याकडे पदभार देण्यात आला आहे.

# जलतरण क्रीडा स्पर्धे साठी निवड

## क्रीडा:तलवाडा शाळेचे दोन विद्यार्थी पात्र



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज दि १५ ऑक्टो रोजी औरंगाबाद ,संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय जलतरण क्रीडा स्पर्धेमध्ये गेवराई तालुक्यातील माध्यमिक विद्यालय तलवाडा शाळेचे दोन विद्यार्थीची लाड युवराज विशाल २०० मीटर बॅकस्ट्रोक ( १७ वर्ष वयोगट) व लाड विश्वास विक्रम १०० मिटर बटरफ्लाय (१४ वर्ष वयोगट) यांची राज्यस्तरीय जलतरण क्रिडा स्पर्धे साठी निवड झालेली आहे.. तसेच लाड कुटुंबातील दोन्ही यशस्वी विद्यार्थी हे राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह शिवाजीराव पंडित ,सचिव जयसिंग पंडित, युवा नेते रणवीरकाका पंडित,युवा नेते पृथ्वीराजे पंडित, तसेच प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य प्रमोद गोरकर पर्यवेक्षक अरून हाटकर सर,क्रीडा शिक्षक पवार सर व शाळेतील सर्व शिक्षक वृंद , तलवाडा पंचक्रोशीतील सर्व गावकरी यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत.. नक्कीच हे दोन्ही विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेऊन आपल्या गेवराई तालुक्याचे व संस्थेचे नाव मोठं करतील यासाठी त्यांना मनापासून पुढील स्पर्धासाठी शुभेच्छा वर्षाव होत आहे.

# उपशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे निलंबित

## दिलासा:महिला शिक्षिकांनी केला पेढे वाटून जल्लोष



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषदेतील माध्यमिक विभागातील उपशिक्षणाधिकारी तथा जामखेडचे तात्कालीन गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे यांना निलंबित करण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी जाहीर केला हा आदेश शिक्षकांना प्राप्त होताच जामखेड सह जिल्ह्यातील विविध भागात आनंद उत्सव साजरा करण्यात आला काही ठिकाणी पेढे वाटून जल्लोष करण्यात आला

जामखेड येथे गटशिक्षणाधिकारी असताना धनवे यांचे विरोधात एका महिला शिक्षकेने तक्रार केली होती धनवे आपणास जाणून-बुजून त्रास देत असतात अशी तक्रारीत म्हटले होते त्यावरून महिला तक्रार निवारण समितीने ऑगस्ट २०२४ मध्ये त्यांची चौकशी केली. चौकशीत सत्य असल्याचा अहवाल समितीने जामखेड गट विकास अधिकारी शिक्षणाधिकारी प्राथमिक तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवला होता जिल्हा परिषदेने अहवाल शासनाकडे पाठवल्यानंतर १५ ऑक्टोबर २०२४ रोजी शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव टी वा करपते यांनी धनवे यांच्या निलंबनाचे आदेश काढले या आदेशाची माहिती काही शिक्षकांना होताच सर्वत्र जल्लोष करण्यात आला जामखेड मध्ये तर काही महिला शिक्षकांनी एकमेकांना पेढे भरून जल्लोष केला

### येरेकर यांचे जिल्हाभरातून अभिनंदन!

जिल्हा परिषदेतील माध्यमिक विभागातील उपशिक्षणाधिकारी तथा जामखेडचे तात्कालीन गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब धनवे यांना निलंबित करण्याची शिफारस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी शिक्षण आयुक्तांकडे केली होती त्यांची दखल राज्य सरकारने घेऊन धनवे यांना निलंबित केले जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी कुणाचाही दबावाखाली न येता निर्भयपणे व शिस्तबद्ध पद्धतीने कारवाई केली व तक्रारदार महिलेला न्याय मिळवून दिला त्या बद्दल जिल्हाभरातून महिला शिक्षिका व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले

# अतिक्रमण हटवण्यासाठी बौद्ध समाज एकवटला

## निर्णय:संत चोखामेळा ट्रस्ट बचाव कृती समितीची स्थापना



रळी/पुण्यभूमी प्रतिनिधी शहरातील निजाम काळापासून अस्तित्वात असलेल्या नेहरू चौक नजीक संत चोखामेळा ट्रस्टची जागा आहे. या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी बौद्ध समाजाची व्यापक अशी बैठक आज दिनांक १६ ऑक्टोंबर रोजी जिजामाता उद्यानात संपन्न झाली .या बैठकीत संत चोखामेळा ट्रस्ट बचाव कृती समिती स्थापन करण्याचे एकमताने ठरविण्यात आले. यासाठी लवकरच पुढील दिशा एक बैठक घेऊन ठरविण्यात येणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील जगमित्र नागा मंदिर, तसेच सोपान काका मंदिर, आणि संत चोखामेळा मंदिरासाठी निजामाने जमिनी दिल्या होत्या. त्यामुळे संत चोखामेळा ट्रस्ट पुढे स्थापन करण्यात येऊन सदर जमीन ट्रस्टच्या ताब्यात देण्यात आली. परंतु या जमिनीवर पुढे चहुबाजूने अनेकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे चोखामेळा यांचे अनेक कार्यक्रम सध्या बंद पडलेले आहेत.

संत चोखामेळा हे वारकरी संप्रदायातील महान असे संत होते. पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनापूर्वी प्रत्येक जण संत चोखामेळा यांचे दर्शन घेत असतो. संत चोखामेळा यांनी बौद्ध विचारावर समतेचे पेरणी केलेले आहे. त्यांचे साहित्य हे परिवर्तनवादी आणि तत्कालीन समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करणारे होते. महाराष्ट्रातील महान संतांच्या यादीमध्ये चोखामेळा यांचा उल्लेख करण्यात येतो.

परळी येथील त्यांच्या नावे असलेल्या ट्रस्टच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी जिजामाता उद्यान येथे समाजाचे आज व्यापक बैठक संपन्न झाली .या बैठकीत भव्य असे चोखामेळा भवन निर्माण करणे, जागेवरील अतिक्रमण काढणे आदींसह ट्रस्टमध्ये विश्वासतांना सोबत घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे असे ठरले. यासाठी लवकरच पुढील बैठक घेण्यात येणार आहे.या बैठकीस समाजातील सर्व ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, समाज बांधव , महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कमलाबाई शेळके काळाच्या पडद्याआड

## दुःखद:मोहन शेळके यांच्या मातोश्री होत



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील यशवंत विद्यालयाचे शिक्षक मोहन शेळके यांच्या मातोश्री तथा लिंबागणेश सर्कलचे प्रतिष्ठित नागरिक बेलेश्वर देवस्थानचे सचिव श्री बाबूराव शेळके यांच्या पत्नीसौ. कमलबाई शेळके यांचे मंगळवार (१५ ऑक्टोबर) रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते.याबाबत अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील बेलगाव बेलेश्वर येथील मूळ रहिवासी असलेले आणि लिंबागणेश सर्कल मधील प्रतिष्ठित नागरिक तथा बेलेश्वर देवस्थानचे सचिव श्री बाबूराव शेळके यांच्या पत्नी आणि बीड शहरातील यशवंत माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक श्री मोहनराव शेळके यांच्या मातोश्री सौ कमलबाई शेळके या मागील काही दिवसापासून आजारी होत्या. बीड जिल्हा रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान दिनांक १५ ऑक्टोबर रोजी त्यांची प्राणजोत मालवली. निधना समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते. कमलबाई बाबुराव शेळके यांना बेलगाव बेलेश्वरपरिसरात 'काकू' या नावाने ओळखले जात होते. सौ. कमलबाई उर्फ काकू शेळके या धार्मिक प्रवर्तीच्या होत्या. यांच्यावर साधू संतांच्या विचारांचा मोठा पगडा होता. त्यांचा स्वभाव शांत, संयमी, प्रेमळ, दयाळू आणि मायाळू होता. त्या सदैव हसतमुख राहत असत. मागील काही दिवसापासून 'काकू' त्या आजारी होत्या. त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते उपचारादरम्यान त्यांची काल दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास प्राणज्योत मालवली.



**परळी:** संपादक बालाजी ढगे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करताना ज्येष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, मातोश्री ऑफसेटचे मालक विठ्ठल साबळे, पत्रकार भगवान साकसमुद्रे,पत्रकार दत्ता शिवगण आदी.

## आवाहन शिवाजी कर्डिलेंना साथ द्या

# राहुरीत मंत्री रामदास आठवलेंचा सन्मान




राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी मागील लोकसभा निवडणुकीत संविधान बदलण्याचा खोटा प्रचार करण्यात आला आता मात्र या निवडणुकीत जनता माजी मंत्री शिवाजी कर्डिले यांना साथ देणार असल्याचे प्रतिपादन केंद्रिय मंत्री ना रामदास आठवले यांनी त्यांच्या केंद्रीय मंत्री मंडळात निवड झाल्या बद्दल आयोजित नागरी सत्कार समारंभात केले

नागरी सत्कार समारंभाचा अध्यक्षस्थानी माजी मंत्री जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले हे होते ना आठवले म्हणाले की मला लोकसभेत काम करत असताना स्व बाळासाहेब विखे पाटील यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली त्यांनी नगर जिल्ह्यात पँथर चळवळीच्या वाढीसाठी सिंहाचा वाटा उचलला होता असे गौरवोद्गार त्यांनी काढले व्यासपीठावर मा खा सुजय दादा विखे-पाटील रिपाइं जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे भाजप युवा मोर्चाचे अक्षयदादा कर्डिले रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्रभाऊ थोरात तालुकाध्यक्ष विलास नाना साळवे भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग तालुकाध्यक्ष सुरेश बानकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते मा खा सुजय दादा विखे-पाटील जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले रिपाइंचे दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील साळवे आदींनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रम साठी रिपाइं चे राज्य सचीव दिपक गायकवाड उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रविण लोखंडे राष्ट्रवादीचे सुनील भट्टड उदयसिंह पाटील आर आर तनपुरे अरुण साळवे शिरीष गायकवाड लहुजी सेनेचे अध्यक्ष कांतीलाल जगधने राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष निलेश शिरसाठ रिपाईचे राहुरी तालुका उपाध्यक्ष सुनील चांदणे हरिभाऊ कर्डिले काशिनाथ खुळे अशोक काळे प्रतिक रुपटके सागर साळवे दाभाडे रवींद्र शिरसाठ राजेश बागुल आदी मान्यवर उपस्थित होते.

### पदाधिकार्यांनी केली श्रीरामपूरची मागणी

ना रामदास आठवले यांच्या कडे श्रीरामपूर विधानसभा राखीव आहे तो रिपाइंला मिळावाच ही मागणी अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली श्रीरामपूर विधानसभा रिपाईला मिळालाच तर नक्कीच रिपाइ उमेदवारचे काम केले जाईल असे प्रतिपादन माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांनी केले

# बलभीम महाविद्यालयाला चॅम्पियन्सशीप

## अभिनंदनिय:आंतरमहाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच आंतरमहाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत धावणे, गोळा फेकणे, भालाफेक, लांब उडी अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये बीड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील २५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत बलभीम महाविद्यालयातील क्रीडा विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये चमकदार कामगिरी करून सेकंड चॅम्पियन्सशीप पटकावली. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष उंदरे, उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, कनिष्ठ विभाग उपप्राचार्य डॉ.संतोष डुबल, प्रबंधक पी.पी.डावकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. जगन्नाथ तत्तापूरे, प्रा. एम.एन. चौरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

**टि.सी हरवला आहे**

भवानी रोड ते केज बसस्टँड प्रवास करीत असतांना आशीष महादेव तेलंग भवानी नगर धारूर रोड केज रा केज जिल्हा येथील टीसी हरवली आहे.
कोणास सापडल्यास या नंबर वर संपर्क करावा.
९३५६६८५५५०

**सुविचार** - खरा सोबती संकटातही उपयोगी पडतो.

## मुहूर्त ठरला...!

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आणि या निवडणुकांसंदर्भातील सगळ्या अनिश्चितता संपुष्टात आल्या. विशेष म्हणजे यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणूक होणार आहे. झारखंडमध्ये मात्र दोन टप्प्यात निवडणूक प्रक्रिया पार पडेल. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होईल आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन पुढच्या विधानसभेचे चित्र स्पष्ट होईल. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण केली जाईल. वर्तमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत असल्याने तत्पूर्वी नवी विधानसभा अस्तित्वात येणे गरजेचे होते, तसे झाले नसते तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी लागली असती, अर्थात तो पर्यायदेखील सत्ताधारी पक्षाकडे होता; परंतु निवडणूक लांबविणे शेवटी आपल्यालाच जड जाऊ शकते, हे लक्षात आल्यावर निवडणूक लांबविण्याचे प्रयत्न थांबविण्यात आले. खरे तर हरियाणासोबतच महाराष्ट्रातीही निवडणूक होणे अपेक्षित होते; परंतु हातावेगळी करण्यासारखी बरीच कामे बाकी असल्याने महाराष्ट्रातील निवडणूक थोडी लांबविण्यात आली. आता कदाचित ती कामे पूर्ण झाली असावीत, त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीचा मुहूर्त निवडणूक आयोगाने घोषित केला. निवडणूक आयोगाच्या घोषणेसोबतच राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली. शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली आमदारांचा एक मोठा गट बाहेर पडला, त्यानंतर राज्यात सत्तांतर झाले आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. ही फूट वैध होती की नाही, निवडणूक आयोगाने शिंदे गटालाच मूळ शिवसेना म्हणून दिलेली मान्यता योग्य आहे की नाही, त्यानंतर अजित पवारांनीही शिंदेंचा कित्ता गिरवित राष्ट्रवादीत फूट पाडली, त्याही गटाच्या बाबतीत तेच प्रश्न उपस्थित झाले होते, या सगळ्या प्रश्नांचा लवकर निपटारा होईल आणि कदाचित सत्ता बदल झाले तर पुन्हा आपल्याकडे सत्ता येईल, अशी आशा महाविकास आघाडीला होती; परंतु सर्वोच्च न्यायालयात प्रकरण लांबत गेले, तारखांवर तारखा मिळत गेल्या आणि उबाठा गटाच्या सगळ्या आशा संपल्या तसे ते 'घटनाबाह्य' सरकार शेवटपर्यंत कायम राहिले. आता निवडणूक कार्यक्रम घोषित झाला आहे, त्यामुळे आता जो काही निवाडा व्हायचा तो जनतेच्या न्यायालयात होणार आहे. आता लढाईचा मुहूर्त निश्चित झाला आहे, दोन्ही बाजू लढण्यासाठी सिद्ध आहेत, अर्थात लढाईची तयारी अगदी शेवटच्या दिवसापर्यंत सुरूच राहते; परंतु दोन्ही बाजूंनी आपापल्या बाह्या सरसावल्या आहेत. खरे तर लोकसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचा उत्साह अगदी शिगेला पोहचला होता. लोकसभा निवडणुकीचा महाराष्ट्रातील निकाल भाजप आघाडीला मोठा धक्का देणारा होता आणि लोकांचा तो कल कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती; परंतु दरम्यानच्या छोट्याशा कालावधीत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. लोकसभेत जबर ठेच लागल्यानंतर महायुती अधिक सावध झाली. अतिआत्मविश्वासाची झूल अंगावरून उतरली आणि महायुती कामाला लागली. विविध समाजघटकांना चुचकारण्याचे प्रयत्न सुरू झाले. लाडकी बहीण सारखी योजना अंमलात आणल्या गेली. लोकसभेच्या तुलनेत विधानसभेचे गणित वेगळे असते. ते किती वेगळे असू शकते याचा अगदी ताजा प्रत्यय हरियाणा विधानसभा निवडणुकीत आला. हरियाणातही महाराष्ट्राप्रमाणेच लोकसभेत भाजप आघाडीला मोठा धक्का बसला होता. आधीच्या लोकसभेत जिंकलेल्या दहाही जागा जिंकणाऱ्या भाजपला यावेळी केवळ पाच जागांवर समाधान मानावे लागले होते. त्या पृष्ठभूमीवर विधानसभेतही भाजपला फटका बसेल असेच म्हटले जात होते. विशेष म्हणजे मागच्या विधानसभेत भाजपला स्वबळावर बहुमताचा आकडा गाठता आला नव्हता. जेजेपी पक्षाच्या मदतीने भाजपने सत्ता स्थापन केली होती आणि निवडणुकीच्या तोंडावर या जेजेपी सोबतचीही युती संपुष्टात आली होती; परंतु लोकसभेचे समीकरण विधानसभेत फिरले आणि भाजपने चमत्कार करीत स्वबळावर बहुमताचा आकडा गाठला. हरियाणातील विजयामुळे महाराष्ट्रात भाजप आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. त्यामुळे आतापर्यंत थोडीफार एकतर्फी वाटणारी लढत आता अगदी काट्याची होईल, असे दिसते. आता पुढचा महिनाभर महाराष्ट्रातील वातावरण निवडणूकमय झालेले असेल. प्रत्येक मतदारसंघात जोरदार लढत पाहायला मिळेल. ऐन निवडणुकीत पक्षांतराला ऊत येईल खरा; परंतु घाईघाईत घेतलेले निर्णय पश्चातापाला कारणीभूत ठरण्याची शक्यता अधिक आहे. एकूणच माहौल आता रंगणार आहे.

## यांची खरी कसोटी....!

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत दोन प्रमुख आघाड्यांमध्ये लढत होत असली तरी या दोन्ही आघाड्यातील दोन मुख्य पक्ष अपेक्षित कामगिरी करतील असे बोलले जात आहे, त्यामुळे सत्ता कुणाची हे इतर दोन पक्षांच्या कामगिरीवर ठरणार आहे. महायुतीत ही निर्णायक भूमिका अजित पवार गटाची असेल तर महाआघाडीत उबाठा गटाची कामगिरी महत्त्वाची ठरणार आहे. भाजप आणि काँग्रेस अपेक्षित कामगिरी करू शकतील, शिंदे गट आणि शरद पवारांचा पक्षदेखील चांगले यश मिळविण्याची शक्यता आहे; परंतु बहुमताचा आकडा गाठणे किंवा त्याच्या जवळपास जाणे हे कोणत्याही दोन पक्षांना शक्य होणार नाही, आघाडीतील तिसऱ्या पक्षाला मिळणाऱ्या जागा त्यामुळेच महत्त्वाच्या ठरणार आहेत. अजित पवार गटाची अवस्था नक्कीच काळजी करण्यासारखी आहे. सध्या त्यांच्याकडे चाळीसच्या जवळपास आमदार असले तरी त्यापैकी किती पुन्हा निवडून येतात हे ठामपणे सांगता येत नाही. अजित पवार गटाची आमदारसंख्या वीस किंवा त्यापेक्षा कमी राहिली तर महायुतीसाठी सत्ता स्थापन करणे नक्कीच मोठे आव्हान असेल. तेच महाविकास आघाडीत उबाठाच्या बाबतीत म्हणता येईल. एकसंध शिवसेनेने मागच्या वेळी ५६ जागा जिंकल्या होत्या, त्यापैकी ४० आमदार शिवसेनेतून बाहेर पडले. हा खड्डा भरून काढण्याचे आव्हान उद्धव ठाकरेंसमोर असेल आणि ते तितके सहज नक्कीच नाही. सध्या सोबत असलेल्या १५ आमदारांचे बळ कायम राखून अजून किमान २५ आमदार निवडून आणायचे असेल तर तर या गटाला खूप कष्ट करावे लागतील. लोकसभा निवडणुकीत उबाठा गटाला मुस्लीम आणि दलित मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले होते, ती मतपेढी कायम राखायची असेल तर हिंदुत्ववादी भूमिकेला मुरड घालावी लागेल; परंतु तसे केल्यास शिवसेनेचा परंपरागत मतदाता शिंदेंकडे झुकण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय काँग्रेस आणि शरद पवार गटाचे मतदार पूर्णपणे उद्धव ठाकरेंना साथ देतील की नाही याबद्दलही शंका आहेच. या पृष्ठभूमीवर अजित पवार गट आणि उबाठा या दोन्ही पक्षांची कामगिरी या निवडणुकीत महत्त्वाची ठरणार आहे. या दोघांपैकी जो गट चांगली कामगिरी करेल त्या गटाच्या आघाडीकडे सत्ता येण्याची दाट शक्यता आहे.

---

**कटाक्ष**

## बाबा सिद्दिकी हत्या! लॉरेन्स बिष्णोई कनेक्शन?



जयंत माईणकर
9821917163

न्यायालय ते सर्वोच्च न्यायालय या तीन न्यायालयांच्या प्रवासावरसुद्धा विशिष्ट कालमर्यादा असावी. कालमर्यादा नसल्यामुळे अनेक खटले वर्षानुवर्षे पडून राहतात. तारीख पे तारीख या बहुचर्चित संवादाप्रमाणे हे खटले तारखांच्या घोळात गुंतून पडतात. न्याय विलंब म्हणजेच न्याय नाकारणे! आणि न्यायालयात न्याय मिळत नाही किंवा त्याला वेळ लागतो म्हणूनच अनेक लोकांचा न्यायालयाबाहेर निकाल काढण्यामागे कल असतो.

माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येमुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर माजी मंत्र्याची अशी हत्या होऊ शकते तर सामान्य माणसाचे काय होईल हा प्रश्नच आहे. गुरमेलसिंह, धर्मराज कश्यप आणि शिवकुमार गौतम या तीन कथित नेमबाजांनी ही हत्या घडवून आणल्याचा आरोप आहे. हे तिघेही हरियाणाच्या तुरुंगात बिश्नोई टोळीच्या सदस्याशी संपर्कात आले होते. तिथेच त्यांना हे कंत्राट देण्यात आले होते.

आरोपी शिवकुमारने स्वतःच बाबा सिद्दिकी यांच्यावर सहा गोळ्या झाडल्या. त्यातील ३ गोळ्या बाबा सिद्दिकी यांना लागल्या. गोळी झाडल्यानंतरच शिवकुमार तेथून पळून गेला आणि आजूबाजूला असलेल्या गर्दीमध्ये झटकन मिसळला. तर त्याचे साथीदार धर्मराज आणि गुरमेल हे दोघेही हातात पिस्तूल पकडून तिथून पळाले, पण थोड्याच अंतरावर पोलिसांनी त्या दोघांना पकडले. धर्मराज आणि गुरमेल यांच्याकडे पिस्तूल होते, पण दोघांनीही गोळीबार केलेला नाही, असे सांगितले गेले.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेला प्रविण लोणकर आणि त्याचा भाऊ शुभम लोणकर हे दोघे सोशल मीडियाद्वारे लॉरेन्स बिश्नोई गँगशी जोडले गेले. हे मूळचे अकोला जिल्ह्यातील अकोटचे! बाबा सिद्दिकींच्या हत्येची जबाबदारी बिश्नोई गँगने स्वीकारली आहे.

शुब्बू लोणकर (शुभम लोणकर) नावाच्या व्यक्तीच्या अकाऊंटवरून ही पोस्ट करण्यात आली होती. या पोस्टमध्ये, लॉरेन्स बिश्नोई टोळीने बाबा सिद्दिकींच्या हत्येची जबाबदारी स्वीकारल्याचे स्पष्ट केले. या पोस्टमध्ये सलमान खान आणि दाऊद गँगचाही उल्लेख करण्यात आला.

पण बाबा सिद्दिकी यांना मारण्याचे आदेश कोणी दिले होते, हे अद्याप समजू शकलेले नाही. बाबा सिद्दिकी यांना मारण्याचा आदेश कोणी दिला होता हे फक्त शिवकुमार गौतमलाच माहीत होते.

बाबा सिद्दिकी मूळचे काँग्रेसचे! स्व. सुनील दत्त यांचे निकटवर्ती! दोनवेळा नगरसेवक, तीन वेळा आमदार आणि चार वर्ष राज्यमंत्री राहिलेले. आज त्यांचा मुलगा झिशान काँग्रेसचे आमदार आहेत, पण काही दिवसांपूर्वी दोघांनीही अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. १९७७ पासून जवळपास पाच दशके काँग्रेसमध्ये राहिलेले सिद्दिकी एकदम अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाण्यास कारण सुमारे सहा वर्षांपूर्वी त्यांच्यावर एन्फोर्समेंट किंवा सध्या प्रचलीत असलेल्या इडीची धाड पडली असता सुमारे ४६२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. आता सिद्दिकी पिता पुत्र सत्तेत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षात सामील होण्यास ही इडीची धाड जबाबदार असल्याचे बोलले जाते. याआधीही महाराष्ट्रात आमदारांच्या हत्या झाल्या आहेत. त्याची सुरुवात १९७० साली कम्युनिस्ट आमदार कृष्णा देसाई यांची हत्या झाली. हत्येचा आरोप शिवसैनिकांवर केला गेला होता. त्यानंतर १९९२ साली परळचे शिवसेना आमदार विठ्ठल चव्हाण आणि बांद्र्याचे भाजपचे आमदार रामदास नायक यांचीही हत्या करण्यात आली होती. गुजरातचे माजी मंत्री हरेन पंड्या यांचीही हत्या करण्यात आली होती. पंड्या भाजपचे असले तरीही मोदी विरोधक होते. देशात आणि केंद्रात भाजप सरकार असताना राज्याच्या माजी गृहराज्यमंत्र्यांची हत्या झाली होती.

बाबा सिद्दिकी यांच्या हत्येवर प्रतिक्रिया देताना छगन भुजबळ यांनी दहा-वीस हजाराच्या बदल्यात पोरं हत्या करण्यास तयार असल्याचे विधान करून मुंबईच्या क्राईम वर्ल्डमधील वास्तविकता सांगितली आहे. गरिबी आणि बेरोजगारी यामुळे तसेच लवकर पैसा कमावण्याच्या हव्यासापायी अशी कृत्य करण्यास लोक तयार असतात.

पण इथे अँगल आहे सलमान खानने तथाकथित मारलेल्या काळविटाचा! काळविटाची पूजा करणाऱ्या बिष्णोई समाजाच्या लॉरेन्स नावाच्या साबरमती जेलमध्ये असलेल्या गुंडाने सलमान खानला धमकी दिली होती. मध्यंतरी सलमान खानच्या घरावरसुद्धा गोळीबार झाला होता. बाबा सिद्दिकी यांची सलमान खानशी असलेली जवळीक त्यांना भोवल्याचे बोलले जाते. त्याचबरोबर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचा यात अँगल असल्याचाही या हत्येमागे असल्याचा संशय आहे. हा लॉरेन्स बिष्णोई तोच आहे ज्याच्यावर मध्यंतरी सिद्धू मुसेवालाच्या खुनाचा आरोप करण्यात आला होता. या खुनाचा संबंध कॅनडापर्यंत पोचला होता. इंटरनॅशनल क्राईमचाच हा प्रकार! केवळ सलमान खानचे मित्र म्हणून बाबा सिद्दिकी यांना टार्गेट केल्याची माहिती सध्या समोर येत आहे. ही वस्तुस्थिती असेल तर ते अधिकच भयावह आहे आणि यावर तातडीने कारवाई केली पाहिजे. गुन्हेगारांना कायद्याचा धाक असला पाहिजे. भारतात न्यायव्यवस्था इतकी हळूवार आहे की खुनासारख्या गंभीर गुन्ह्याचा निकाल लागायला दहा-वीस वर्षे सहज लागतात. यामुळेसुद्धा अनेक वेळा कायदा हातात घेऊन बदला घेण्याची प्रवृत्ती वाढते.

न्यायालय ते सर्वोच्च न्यायालय या तीन न्यायालयांच्या प्रवासावरसुद्धा विशिष्ट कालमर्यादा असावी. कालमर्यादा नसल्यामुळे अनेक खटले वर्षानुवर्षे पडून राहतात. तारीख पे तारीख या बहुचर्चित संवादाप्रमाणे हे खटले तारखांच्या घोळात गुंतून पडतात. न्याय विलंब म्हणजेच न्याय नाकारणे! आणि न्यायालयात न्याय मिळत नाही किंवा त्याला वेळ लागतो म्हणूनच अनेक लोकांचा न्यायालयाबाहेर निकाल काढण्यामागे कल असतो.

देशात एवढ्या मोठ्या प्रमाणात केसेस पेंडिंग राहायला कारण अर्थात देशाची अफाट लोकसंख्या. सध्या भारतात अंदाजे २५००० न्यायाधीशांची पदे आहेत आणि संपूर्ण देशात जवळपास ४ कोटी सत्तर लाख केसेस प्रलंबित आहेत. बारा वर्षांपूर्वी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती व्ही.व्ही. राव यांनी देशातील सर्व खटल्यांचा निकाल लागायला ३२० वर्षे लागतील असे विधान केले होते. न्यायव्यवस्था अधिक बळकट करणे आवश्यक आहे. लोकांना कायद्याचा धाक राहिला तरच अशा घटनांना चाप बसेल.

तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

**अवकाश**

## स्टारशिपच्या यशामुळे अवकाश प्रवास शक्य!



प्रा. सुरेश चोपणे
9822364473
खगोल अभ्यासक, अध्यक्ष- स्काय वॉच ग्रूप
(सदस्य, इंडियन सायन्स काँग्रेस, मराठी विज्ञान परिषद), चंद्रपूर

जगात पृथ्वीवर सर्वत्र भ्रमण केल्यानंतर आता कुठे जायचे असा प्रश्न श्रीमंत लोकांना पडतो, त्यांच्यासाठी हे अवकाश यान पृथ्वीचा आणि चंद्राचा फेरा मारण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. एवढेच नव्हेतर चंद्रावर जाऊन एक दिवस मुक्काम ठोकून पृथ्वीवर येण्यासाठी वरदान ठरणार आहे. काही श्रीमंत लोक तर मंगळावरसुद्धा जाऊन येऊ शकतात. पूर्वी विमान प्रवास खूप महागडा होता आणि सामान्य माणसाच्या अवाक्याचे बाहेर होता, आज तो स्वस्त झाला आहे, त्याप्रमाणेच आज जरी अवकाश सफर महाग वाटत असली तरी भविष्यात ती स्वस्त होणार आहे. त्यामुळे सर्वांनी अवकाश सफारीसाठी तयार राहावे.

मागील रविवारी एलन मस्क यांच्या स्पेस एक्स कंपनीच्या स्टारशिप यानाच्या ५ व्या अवकाश यान चाचणीचे उड्डाण यशस्वी झाले आणि जगात अवकाश पर्यटनाच्या आणि अवकाश संशोधनाच्या आशा पल्लवित झाल्या. अनेक अपयश येऊनही एलन मस्क खचले नाही, नवनवीन कल्पना साध्य करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न चालविला आणि शेवटी ५ व्या चाचणीला यश आले. आता स्टारशिपच्या प्रगतीला पंख फुटतील.

**स्पेस एक्सचा इतिहास-** स्पेस एक्स ही अवकाश कंपनी एलन मस्क यांनी २००२ मध्ये स्थापन केली. त्यांनी ऑर्बिटल लॉंच वेहिकल फॉल्कन १ ते ९ हे रॉकेट आणि ड्रॅगन स्पेसक्रोफ्ट बनविले असून त्यांची आतापर्यंत ३०० उडान केली आहेत. नंतर व्यावसायिक लॉंच वेहिकल बनविले, इंटरनेट सर्व्हिस पुरविण्यासाठी स्टारलिंक उपग्रह बनविले आहेत. लिक्विड प्रपोलंट रॉकेट आणि व्हर्टिकल प्रपोल्सिव लॅंडीग सिस्टीम बनविणारी ही जगातील पहिलीच कंपनी आहे. या कंपनीचे एकूणच उद्दिष्ट हे मंगळावर जाणे आणि अवकाश पर्यटन साध्य करणे आहे. २०१९ मध्ये कंपनीने स्टारशिपची घोषणा केली. पहिला प्रयत्न फसला कारण यानात स्फोट झाला. दुसरी चाचणी करताना यानात पुन्हा स्फोट झाला. तिसरी चाचणी ९० टक्के यशस्वी झाली, केवळ यांत्रिक बिघाड झाला तेवढेच. चौथी चाचणी केली गेली त्यातही केवळ कॉम्पुटर आणि इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणेत बिघाड झाला होता. शेवटी ५ वी चाचणी यशस्वी झाली आणि अवकाश प्रवासाच्या आशा बळावल्या.

**स्टारशिप कसे आहे-** स्टारशिप शिप हे जगातील सर्वात अवजड यान आणि रॉकेट असून त्यातील लॉंच वेहिकलची क्षमता १५० टन असून ती २५० टनापर्यंत वाढविल्या जावू शकते. त्याची पे लोड क्षमता १००.१५० टन आहे. ५० मीटर उंची एप्रोपेलंट क्षमता १२०० टन आणि थ्रस्ट क्षमता १५०० टीएफ आहे. याचे रॉकेट हेसुद्धा विशाल असून त्याची क्षमता हीसुद्धा फार आहे. ७१ मीटर उंची, ९ मीटर व्यास, प्रोपेलंट क्षमता ३४०० टन, थ्रस्ट ७५९० टीएफ आहे. याचे राप्टर इंजीन हे लिक्विड मिथेन आणि ऑक्सिजनवर काम करते. त्याचा व्यास १३ मीटर असून ३३० टीएफचा थ्रस्ट आहे. इतके मोठे वजन अवकाशात नेण्याची क्षमता आजच्या काळात अशक्य वाटावी अशीच आहे. म्हणजेच एकाच वेळी १०० अवकाश यात्री आणि सर्व सामान घेऊन जाण्यासाठी हे विशाल अवकाश यान बनविण्यात आलेले आहे.

स्टारशिप यान हे प्रचंड विशाल आहे. १३ ऑक्टोबर २०२४ ला जवळजवळ २० मजली उंच, २५० टन वजन आणि २३३ फूट उंच असे हे अजस्त्र यान आणि रॉकेट आकाशात झेपावले. जमिनीवरून एवढे वजन उचलणे हेच एक कठीण काम होते; परंतु अवाढव्य आकाराचे रॉकेट बुस्टरच्या सहाय्याने स्पेसशिपला अवकाशात झेपावण्यात आले. ज्या यांत्रिक मॅकेझिला हाताने यानाला आधार देण्यात आला होता त्याच हाताने यानाला वापस येताना अलगद पकडण्यात आले. सुरुवातीला बुस्टर वेगळे झाले आणि समुद्रात पडले. हे यान पुढे कमी अधिक २००० किमी तासी वेगाने ९५ किमी वर आकाशात उडाले आणि इंजिन बंद करण्यात आले. पुन्हा ते उड्डाण स्थळाच्या जवळ येताच इंजिन सुरू करण्यात आले आणि हळूहळू यान अलगद मेकेझीलाच्या कुशीत सामावले.

**अवकाश पर्यटन सुरू होणार-** जगात पृथ्वीवर सर्वत्र भ्रमण केल्यानंतर आता कुठे जायचे असा प्रश्न श्रीमंत लोकांना पडतो, त्यांच्यासाठी हे अवकाश यान पृथ्वीचा आणि चंद्राचा फेरा मारण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. एवढेच नव्हेतर चंद्रावर जाऊन एक दिवस मुक्काम ठोकून पृथ्वीवर येण्यासाठी वरदान ठरणार आहे. काही श्रीमंत लोक तर मंगळावरसुद्धा जाऊन येऊ शकतात. पूर्वी विमान प्रवास खूप महागडा होता आणि सामान्य माणसाच्या अवाक्याचे बाहेर होता, आज तो स्वस्त झाला आहे, त्याप्रमाणेच आज जरी अवकाश सफर महाग वाटत असली तरी भविष्यात ती स्वस्त होणार आहे. त्यामुळे सर्वांनी अवकाश सफारीसाठी तयार राहावे.



**लवकरच ग्रहीय प्रवास सुकर-** आज अवकाशात संशोधन करण्यासाठी लागणारी रॉकेट आणि वाहन हे अगदी लहान असल्याने जास्त अवकाश यात्रींना नेणे शक्य होत नाही. अतिरिक्त साहित्य नेण्याची तर कल्पना करवत नाही. त्यातही मंगळ, गुरू, शनी अशा लांब पल्ल्याच्या आंतरग्रहीय प्रवासाचे तर आपले स्वप्नच राहिले आहे. अशावेळी हे स्पेसशिप अतिशय वेगाने आणि कित्येक प्रवाशांना घेऊन दूरच्या सफरीवर जाऊ शकते. पृथ्वीवरील उपग्रहांना त्वरित साहित्य पुरविणे, चंद्रावर सामान घेऊन जाणे आणि रहिवास केम्प बनविणे, मंगळावरसुद्धा अनेकांना साहित्यासह घेऊन जाऊन तिथे राहण्या योग्य स्थिती बनविणे, गुरू ग्रहाचा प्रवास सुकर बनविणे हे सर्व या स्पेसशिपमुळे सहज शक्य आहे. तर चला जाऊया लवकरच अवकाश सफारीला.

---

**वास्तव**

## धोरण निश्चितीअभावी महासत्ता बनण्याची स्वप्ने परिपूर्ण होतील का?



राजन पांजरी
9819700818

भारताचे राजकीय नेते देशाला जगातली उच्च स्तरावरील महासत्ता होण्याची स्वप्ने दाखवित असताना मोठमोठ्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या असल्याच्या घोषणा देत असतात. मात्र, त्या घोषणांची प्रत्यक्षात किती प्रमाणात अमंलबजावणी होत आहे, याकडे जबाबदारीने लक्ष केंद्रीत करताना दिसत नाहीत. याला कारण घोषणांवर घोषणा करण्याची जी घाई केली जात आहे त्यांचा काहिसा अतिरेक होऊ लागल्याचे दिसून येत आहे.

देशात रोजगाराचा प्रश्न उपस्थित होत आहे त्यावर सरकारतर्फे काही धोरणनिश्चिती न केल्याने बेरोजगारांना रोजगार मिळवून देत बेरोजगारी कमी करण्याऐवजी ती सातत्याने वाढल्याची आकडेवारी जाहीर केली जात आहे ती ४० टक्क्यांवर पोहोचली आहे. त्यावेळी २५ कोटींहून अधिक लोक दारिद्र्य रेषेखाली असल्याचीही आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. या साऱ्या वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण राखता न आल्याने निर्माण झालेल्या समस्या आहेत. त्याचे दुष्परिणाम समाजातील रोजगार मिळविलेले आणि बेरोजगार राहिलेल्यांमध्ये निर्माण होत असलेली दरी वाढत जाऊन समाजात जात धर्म, संप्रदाय, भौगोलिक विविधतेचे प्रश्न अधिक गहन होत जाऊन विषमता वाढत जात आहे. या व्यतिरिक्त देशातील नोकऱ्यांमध्ये महिला व पुरुष असे गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होतच असतात ते वेगळे.

या प्रश्नांबरोबर देशाची वाढती लोकसंख्या ज्या वेगाने वाढत आहे त्या अंदाजानुसार ती सन २०५० मध्ये १६० कोटी ही संख्या पार करण्याची शक्यता आहे. यंदाच्या जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भारतीय लोकसंख्येची जाहीर झालेली आकडेवारी सांगते, की सध्या देशातील सर्वाधिक असलेली तरुणांची संख्या कमी होत जाऊन वयाची साठी पार पडलेल्यांची संख्या २०५० पर्यंत ३४ कोटींवर जाईल आणि त्या वृद्धांच्या संगोपनाची उद्भवणारी जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. आपल्या देशात गेली काही वर्षे नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पुराची संकटे, भूस्खलन, चक्रीवादळे, वीज कोसळणे यांसारख्या संकटांना सामोरे जाणे आता नित्याचेच झाले आहे असे दिसून येते. अशा संकटांपूर्वी पूर्व अंदाज वर्तविले जात असतात. विदेशांत जेव्हा नैसर्गिक आपत्तीं उद्भवतात तेव्हा तिथे विज्ञान, तंत्रज्ञान यांचा वापर करून जीव आणि वित्त हानी होणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. त्यासाठी मानव निर्मित आपत्ती किंवा नैसर्गिक संकटांवर मात करण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान व व्यवस्थापन विकसित केले गेले आहे. आपल्या देशात मात्र एनडीआरएफसारखी यंत्रणा कामास आणावी लागते किंवा विदेशातून तंत्रज्ञ बोलवावे लागतात. म्हणजेच आपत्ती निवारण किंवा व्यवस्थापनाची गरज जी प्रामुख्याने भासत आहे तिची पूर्तता केली जावी. देशातील बदलते हवामान, विशेषतः पावसाळा, थंडीचे दिवस यांत हवामान बदलांमुळे होणारे आजार, त्यातील काही संसर्गजन्य प्रकारचे असतात, तर काही साथीने पसरत जाणारे असतात. त्यांच्यासाठी प्रतिबंधात्मक उपचार करणाऱ्या संस्था, इस्पितळे यांची संख्या नगरांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठेवली जावी. ग्रामीण भागात तर अशा सोयींचा अभाव दिसून येतो. आरोग्य सेवेने मागाहून दुरूस्त्या करण्यापेक्षा प्रतिबंधक उपाययोजना करून लोकांच्या आरोग्याच्या, वाहतुकीच्या गैरसोयी टाळाव्यात असे वाटते. सरकारांनी या सर्व बाबींचा विचार करून योग्य त्यासोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

वाहतूक, वाहतूक कोंडी, वाहतुकीसाठी वाढीव दर आकारले जातात त्यामुळेच जनसामान्यांना आवश्यक धान्य खरेदी करताना अधिक किंमत मोजावी लागते, हे सारे सामान्यांचे जीवन समृद्ध करण्याऐवजी अधिक त्रासदायक करण्याकडे प्रशासकीय यंत्रणांचा म्हणजेच सरकारांचा कल असतो. हे सर्व जाणते-अजाणतेपणे होत असले तरीही त्याबाबत दुर्लक्ष केले जाते, असे सत्कृतदर्शनी दिसून येते. या सर्व बाबींचा विचार करता भारताला महासत्ता बनण्याच्या दिशेने अनेक प्रकारच्या समस्या सोडवाव्या लागणार आहेत याचा अभ्यास करून पुढची पावले उचलण्याची गरज आहे.

---

**वाचक विचार मंच**

राज्यातील विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी गेल्या चार बैठकांमध्ये राज्याच्या मंत्रिमंडळाने १५० निर्णय घेतले आहेत. यातील बरेच निर्णय राज्याच्या वित्त विभागाची परवानगी न घेता घेतले असल्यास त्या विभागाकडून आर्थिक तरतूद केली नसल्यास त्या निर्णयांची अंमलबजावणी होईल असे वाटत नाही. वित्त विभागाला मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती पुरविल्याशिवाय आर्थिक तरतूद करणे सामान्यतः शक्य होत नाही. वित्त विभागालादेखील मोठ्या रकमेची तरतूद करण्यासाठी सरकारी तिजोरीवर पडणारा ताण आणि कररूपाने जमा झालेली रक्कम आणि त्यापूर्वी केली गेलेली तरतूद यांची सांगड घालावी लागते. मंत्रिमंडळ आचारसंहितेपूर्वी अजूनही काही लोकाभिमुख नव्या आर्थिक योजनांसाठी तरतूद करण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. राज्य वित्त विभागाला मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय कदाचित मंजूर करण्यात अडचणी आल्यास पैशांची कमतरता भासू शकते. त्यावर उपाय म्हणून राज्य मंत्रिमंडळाने रिझर्व बँकेकडे १२५ कोटी रुपयांच्या कर्जांची मागणी केली आहे. यावरून राज्य सरकारने आचासंहितेपूर्वी घेतलेल्या निर्णयांना वित्त विभागाला दूर ठेवले होते हे लक्षात येते.

### निर्णय घेतले; वित्त विभागाला विचारात घेतले का?

सध्याच्या राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता राज्यावरील कर्जांचा बोझा अंदाजे ७८२,९९१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून प्रतिवर्षी सुमारे ५६,७२७ कोटी रुपये कर्जाची परतफेड करावी लागते, हे राज्याच्या वित्त विभागाला विचारात घेऊन त्यानुसार तरतुदी करून ठेवणे भाग पडते. मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री निर्णय घेऊन बाजूस होतात आणि त्या निर्णयांची अंमलबजावणी पार पाडण्यासाठी वित्त विभागाला इतर विभागांशी सल्ला मसलत करून अंदाज बांधावे लागतात आणि त्यांच्या मंजुरीसाठी पुन्हा मंत्र्यांशी चर्चा व मान्यता घ्यावी लागते, असे दोन्ही बाजूंनी कोंडीत पकडले जाऊ नये म्हणून सावधानतेने पुढे चालावे लागते. अशा परिस्थितीत जो काही निर्णय घेतला जाईल तो प्रत्यक्षात आणण्यासाठी वित्त विभागाला करांचे ओझे जनतेवर लादण्याशिवाय दुसरी गत्यंतर नसते. आपल्यासारख्या विचारी नागरिकांनी याचाही अंदाज घेत आपल्याही आर्थिक जमाखर्चांत योग्य ती तरतूद करण्याची तयारी ठेवलेली बरी!

**स्नेहा राज**
गोरेगाव, मुंबई.
मो.नं.- ९९६७०१५८९९

---

**धमस**

### जुगाड स्पेशालिस्ट

'घड्याळा'च्या काट्यांशी
जर जुळले नाहीत आकडे
तर लगेच मार्ग बदलून
जाऊ 'इंजीन' असेल तिकडे

तेथे नसेल जागा तर
'तुतारी' यंदा फुंकायची
नाहीतर 'पंजा' लढवून
निवडणूक नक्की जिंकायची

'आय'ने नकार दिला
तर 'मातोश्रीं'कडे जाऊ
'सामना' करण्यासाठी
'मशाल' हातात घेऊ

तरीही नाही जमली
जर तेथे आपली भट्टी
त्याचवेळी प्रयत्न करून
जमवू 'कमळा'काकुंशी गट्टी

त्यांच्या 'संघा'ने विरोध करून
जर 'परिवारा'ने केला वांधा
तर 'धनुष्यबाणा'साठी
सज्ज ठेवू आपला खांदा

तेथे जुगाड जमण्याची
आशा दिसली नाही किंचित
त्यावेळी म्हणू आपण
आम्हीही आहोत 'वंचित'

कुणाशीही सुत जुळले नाही
तर शोधू एखादी नामी युक्ती
'परिवर्तना'साठी पाठीशी
उभी करा म्हणू 'महाशक्ती'

कुठेही बस्तान बसले नाही
तरी मनात जिद्द ठेवू कायम
लगेच आपले पुढचे टार्गेट
थेट गाठायचे 'एमआयएम'

एवढं सर्व करूनसुद्धा
कुठेही रोवता आले नाहीत पाय
तर मग सर्वात शेवटी
अपक्ष लढणे हाच उपाय

**ॲड.अनंत खेळकर**
अकोला

---

**संवाद**

## वाहनधारकांना दिलासा!

राज्य सरकारने १४ ऑक्टोबरच्या मध्यरात्री १२ वाजल्यापासून मुंबईच्या प्रवेशद्वारावर असलेल्या ऐरोली, वाशी, दहिसर, मुलुंड (एलबीएस मार्ग) आणि मुलुंड (पूर्व द्रुतगती महामार्ग) या ५ टोलनाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना टोलमाफी देण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला आहे. येणाऱ्या विधानसभेच्या पार्श्वभूमीवर विधानसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी शासनाने घेतलेला पथकरमाफीचा हा निर्णय सर्वसामान्यांच्या पथ्यावर पडणारा आहे. वास्तविक रस्ते हवे असतील आणि तेही चांगले रस्ते, तर टोल भरावाच लागेल असे सांगून टोल नावाचा एक जिझिया कर वर्षानुवर्षे लोकांच्या बोकांडी मारण्यात आला होता. त्यालाही आता बराच काळ उलटून गेला आहे. मुंबईच्या प्रवेशद्वारावरील या टोलच्या भस्मासुराने जनतेच्या अक्षरशः नाकीनऊ आणले होते. अनेक आंदोलने झाली. टोल बंद व्हावा म्हणून सरकार दरबारी अनेकवेळा अर्ज आर्जवे करण्यात आली होती.


अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट झाली, पण टोलरूपी भस्मासुराला त्याने काहीही फार पडला नाही. उलट दिवसेंदिवस या टोलमुळे जनतेच्या त्रासात भर पडत चालली होती. आता विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने का होईना, या टोलमाफीमुळे हलक्या मोटर वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
६८, श्रीरामवरदायिनी मंदिर मार्ग,
पार व्हिलेज,
महाबळेश्वर-४१२ ८०६

---

**गुल्लेर**

## कानफुके बाबा



नरेंद्र इंगळे
9561226572

'बाबा आहेत काय अंदर?'
'बाबा समाधीत आहेत.'
'कधी सुटते समाधी! आम्ही बऱ्याच वेळचे आलो.'
'पाच मिनिटे थांबा.. बाबा येतातच बाहीर.'
'बाबा कोन्या गावचे आहेत.'
'बाबाले गाव नाही. बाबा स्वयंभू आहेत.'
'स्वयंभू म्हनजे?'
'म्हनजे ते आपोआप प्रगट झाले. बाबानं हिमालयात दोनशे वर्षे तप केलं.'
'दोनशे वर्षाचा मानूस तरी असते काय?'
'मुका बस बबन.. साधूची टिंगल करु नोय.'
'काय नाव आहे बाबाचं?'
'कानफुके बाबा! ते कानात मंत्र सांगतात. तो मंत्र कोनाले सांगा लागत नाही.'
'सांगतला की काय होते?'
'हातपाय हेकोळे होतात. सरके बसा भाऊ. तुमचे नावं चिठ्ठीवर लिहून द्या..'
'आले बाबा.. म्हना.. कानफुके बाबाकी जय..'
'बाबासोबत दोन जवान पोरी आहेत.'
'त्या पोरी नाहीत. मागच्या जन्मातल्या साध्वी आहेत..'
'मागचा जन्म कोनं पाह्यला? हा अलग जांगडगुत्ता दिसते.'
'आरामानं बोल.'
'काहो भाऊ.. बाबा गुंडाच दिसते.. काही भामटे खून करुन फरार होतात. तिकडे जाऊन साधूचं सोंग घेतात.'
'मुका बस. कोनाले आयकू जाईन.'
'चला लिडर पुढे.. तुमची समस्या सांगा.'
'बाबा, मी विधासभेत अपक्ष उभा राह्यतो.. निवडून येईन काय?'
'कान करा इकडे.. कानात सांगतो.'
'ओ लिडर.. दक्षना टाका पेटीत.'
'पाचशे रुपये टाकले.'
'पाचशानं जमत नाही.. हजार टाका.'
'एक पाचशाची दे बबन.'
'चला बाहीर. लय गर्दी झाली.. बाकीच्या लोकाईले येऊ द्या.'
'काहो भाऊ, काय सांगतलं बाबानं तुमच्या कानात?'
'बाबा म्हनत कोनाले सांगू नको.'
'मी सांगत नाही. फक्त मलेच सांगा.'



**परळी** विधानसभा मतदारसंघ हा राज्याला ओळख असलेला मतदारसंघ आहे. वैद्यनाथ प्रभूंच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेली भूमी, मराठवाड्यातील सर्वात जुने रेल्वे स्थानक असल्याने दळण वळणाच्या बाबतीत जोडल्या गेलेले शहर. येथील अर्थव्यवस्था ही बहुतांश कृषी केंद्रित अर्थव्यवस्था आहे. जसा हा भाग ऊसतोड मजुरांचा भाग म्हणून ओळखला जातो तसाच हा भाग विविध अंगांनी ओळखला जातो. राजकीय दृष्ट्या राज्याला परिचित असलेला हा मतदार संघ आणि तालुका आहे. पूर्वीचा रेणापूर असलेला हा मतदारसंघ १९९२ ला परळी मतदार संघात रूपांतरित झाला. या मतदार संघाचं वैशिष्टय म्हणजे हा कायम पुरोगामी विचारांच्या पाठीशी राहिलेला मतदार संघ आहे. अण्णाभाऊ गित्ते, रघुनाथराव मुंडे, पंडितराव दौंड, स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासारखे मोठे नेतृत्व या भागाने राज्याला दिलेले आहेत. सोयाबीन, ऊस, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या इथे मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येईल. राजकीय दृष्ट्या फार संवेदनशील असलेला हा भाग आहे. राज्यातील बड्या नेतृत्वापैकी शरद पवारांच्या आणि गोपीनाथराव मुंडे यांच्याच विचारांच्या पाठीशी उभा असलेला हा भाग आहे. अलीकडच्या काळात राजकीय अदलाबदलीत जुनेच परंतु नव्याने राजकीय पटलावर उदयास आलेले व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ फड... त्यांनी नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने परळी मतदारसंघात हे नाव विशेष अर्थाने आता पुढे आले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर जरी हे नाव नव्याने आले असेल तरीही त्यांचा राजकीय अनुभव मोठा आहे, सामाजिक कार्याचे व्यासंगी व्यक्तित्व असल्याने मोठा लोकसंपर्क आहे, कारखानदार आणि व्यावसायिक असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाणीव आहे, उच्च शिक्षित असल्याने महिला, मुली आणि विद्यार्थ्यांच्या नेमक्या प्रश्नांची जाण आहे. त्यांच्या व्यक्तित्वच्या जुन्याच परिचयाचा हा नव्याने धांडोळा...

# राजेभाऊ फड

Rajebhau Phad

## बहुआयामी उच्चशिक्षित व्यक्तिमत्व...



०३ जून १९८० रोजी राजाभाऊ फड यांचा कन्हेरवाडी येथे जन्म झाला. इथेच प्राथमिक शिक्षण झाले आणि परळी वैजनाथ येथे पुढील शिक्षण त्यांनी घेतले. पदवीचे शिक्षण पूर्ण करून बिपिएड पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनातच चळवळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. आज जरी राजकीय क्षेत्रात त्यांची नव्याने ओळख महाराष्ट्राला झाली असली तरी ते मागील अनेक वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या पक्षाचे युवक प्रदेश उपाध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. त्यांचे सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांना २०१९ विधानसभा निवडणुकीत निवडून आणण्यात "किंगमेकर" म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यांनी रणमैदानात बाजी मारली. विशेष म्हणजे जनतेच्या प्रश्नांची जाण ठेवत आलेल्या अडचणींना दूर करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आणि आजही करत आहेत. जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी ते प्रत्येकाच्या हाकेला धावून जातात. एकदा जुळलेली नाळ ते कधीही तुटू देत नाहीत त्यामुळे त्यांचा सर्वदूर जनसंपर्क आहे ही त्यांच्या जमेची विशेष बाजू आहे असे म्हणावे लागेल. प्रत्यक्षात जाऊन काम करणे याचा अर्थ काय...? तर सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करत असताना ज्या लोकांच्या पाठबळावर आपण राजकारण करतो त्यांच्या प्रत्येक अडचणीला धावून जाणे हा राजाभाऊ फड यांचा स्वभाव. स्वतःच्या आईला सरपंच करण्याचे आणि हेलिकॉप्टरने गावात घेऊन येण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण करून दाखवले. "जोपर्यंत आई सरपंच आहेत तोपर्यंत गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नाला १० हजार रुपयांची मदत करणार" अशी प्रतिज्ञा त्यांनी केली आणि अखंडपणे ते आजही पाळत आहेत. मागील २५ वर्षांपासून ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात आहे. सरपंच म्हणून मतदारसंघातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या गावाचा त्यांनी कायापालट करून दाखवला. शासकीय योजना खेचून आणणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि विकासाची ही गंगा सर्वसामान्य लोकांच्या उंबऱ्यापर्यंत नेण्याचे काम राजाभाऊ यांनी केले आहे. हाच वासा आणि वारसा कायम अखंडपणे त्यांनी पुढे सुरू ठेवला आहे.



## राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सर्वपरिचित हक्काचा माणूस

### उद्यमी कार्यकर्ता!

### संवेदनशील युवा नेता

### दूरदृष्टीचा माणूस

प्रस्थापितांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी आजवर राजकारण केले. गुंडगिरी, दादागिरीला न जुमानता अनेक निवडणूका त्यांनी लढवल्या. कधी विजय वाट्याला आला तर कधी पराभव झाला. ऊन सावलीच्या या खेळाची गंमत त्यांनी पाहीलेली आहे. 2019 च्या गंगाखेड विधानसभा निवडणुकीत सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांची संपूर्ण प्रचार यंत्रणा हाताळली. त्या निवडणूकीत त्यांनी श्री गुट्टे यांना निवडणूक आणले आणि किंगमेकर ठरले. राजेभाऊ फड यांनी कोद्री जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली मात्र त्यात त्यांचा अल्प मतांनी निसटता पराभव झाला. परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी दणदणीत विजय मिळवला. ही निवडणूक संपूर्ण राज्यात गाजली होती. कृ.ऊ.बा.च्या निवडणूकीत तर त्यांच्या समोरील उमेदवार हे आताचे आमदार आहेत. म्हणजेच अत्यंत टोकाच्या लढाया लढून एखाद्या योद्ध्याप्रमाणे त्यांनी जिंकल्या आहे. झालेच तर कन्हेरवाडी ग्रामपंचायतचा मागील अनेक वर्षांपासून ते कारभार पाहत असल्याने त्यांना मोठा राजकीय अनुभव आहे.



व्यवसायाकडून राजकारणाकडे वळत असतांना त्यांनी काही गोष्टींचा विचार नक्कीच केलेला होता. ज्या क्षेत्रात आपण जात आहोत, त्या क्षेत्राचा लोककल्याणासाठी आणि जनसेवेसाठी वापर करायचा असाच ठामनिश्चय त्यांनी केलेला होता. आजवरच्या जीवनात त्यांनी अनेक राजकीय पक्षांमध्ये काम केले. पक्ष जरी बदलले असले तरी ते नेतृत्व, ते व्यक्तीमत्व आणि त्यांच्यातील कार्यकर्तृत्वाचे गुण मात्र जशास तसेच आहेत. भाऊंच्या कामाच्या कार्यकक्षा कुठल्याही एका वर्तुळापुरत्या मर्यादीत नाहीत. सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, धार्मिक, शैक्षणीक अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांची भरीव कामगिरी आहे. वेळ, काळ आणि प्रसंग ओळखून धावून जाण्याची त्यांच्याकडे हातोटी आहे. एरव्ही तर ते त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला पूर्ण क्षमतेने मदत करतातच, मात्र सार्वजनिक संकटांच्या काळातही ते नेहमीच निरपेक्ष भावनेने समाजसेवेसाठी पुढे असतात. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी शेकडो नव्हे तर हजारो जीवांना मदत केली. निराश्रीतांना आसरा, तहानलेल्यांना पाणी, भुकेल्यांना अन्न आणि गरजूंवर उपचाराची त्यांनी सोय केली. एकूणच त्यांनी चौफेर पध्दतीचे काम या काळात त्यांनी केले. असे नव्हे की फक्त गावातील आणि शहरातील गरजवंतांच्या मदतीला ते धावून जातात, तर मतदारसंघातील शहरी आणि ग्रामिण भागातील प्रत्येकाच्या मदतीला जाण्यास ते नेहमी तत्पर असतात. मदतीचा हात पुढे करीत असतांना त्यांनी नाव, गाव, जात, पात, पक्ष, शहरी, ग्रामिण असा कधीही भेदभाव केला नाही. आपल्याकडे आलेला माणूस हा आपलाच असे ते समजतात. ज्यांनी आपल्याला जीव लावला ती जीवाची माणसं असे समजण्याचा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. आगामी विधानसभा निवडणूकीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून त्यांना तिकीट मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यांनी पक्षाकडे मुलाखतसुध्दा दिलेली आहे. पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब जे सांगतील तोच उमेदवार अंतिम असून, आपणही त्यांच्याच आदेशाचे पालन करणार असल्याचे ते म्हणतात. पक्षाने दिलेला उमेदवार म्हणजे तोच आमदार हे समजून ते या निवडणूकीत कामाला लागले आहेत...

- अक्षय मुंडे

# बीडमध्ये राष्ट्रवादी झाली सज्ज!

## डॉ.योगेश क्षीरसागर | सोशलमीडिया, बूथ व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सातत्याने दावा केला जात आहे. आता आचारसंहिता जाहीर झाली असून निवडणुकीसाठी बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सज्ज झाला असल्याचे चित्र आहे.

बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आयोजित सोशल मीडिया आणि बूथ व्यवस्थापनाचे प्रभावी प्रशिक्षण नुकतेच संपन्न झाले. ज्यात ४७५ पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणातून सोशल मीडिया तंत्रज्ञानाचे आधुनिक कौशल्य आणि बूथ व्यवस्थापनाच्या रणनीती शिकत, जनसंपर्क अधिक प्रभावी कसा करता येईल, याचे धडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे देण्यात आले. पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आढावा घेतल्यानंतर बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणूक लढवण्यासाठी सज्ज असल्याचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्पष्ट केले आहे.




### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतला बूथनिहाय आढावा

बीड मतदारसंघात पक्षाच्या खाजगी कंपनीकडून सुरू असलेल्या प्रचार व प्रसार मोहिमेवरून सध्यातरी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना उमेदवारी असल्याचे संकेत मिळत आहेत. तसेच, यापूर्वी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी देखील ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना केलेल्या आहेत. नुकताच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बूथनिहाय आढावा घेऊन यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे.

### बीडची जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच

यापूर्वी अनेकदा बीड विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळणार असल्याचा दावा खुद्द उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी देखील केलेला आहे. तसेच महायुतीकडून सुरू असलेल्या वाटाघाटीत बीडच्या जागेवर शिक्कामोर्तब झाले असून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेला जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतला बूथनिहाय आढावा

बीड मतदारसंघात पक्षाच्या खाजगी कंपनीकडून सुरू असलेल्या प्रचार व प्रसार मोहिमेवरून सध्यातरी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना उमेदवारी असल्याचे संकेत मिळत आहेत. तसेच, यापूर्वी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी देखील ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना केलेल्या आहेत. नुकताच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बूथनिहाय आढावा घेऊन यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले आहे.

# माजलगावचा कुस्ती स्पर्धेत दबदबा

**क्रीडा:** सुमितकुमार भारस्कर सुवर्णपदकाचा मानकरी




माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन अंतर्गत राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२४-२५ (१९ वर्षाखालील - फ्रीस्टाईल) ता. १४/१५ ऑक्टोंबर २०२४ रोजी बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी, जि. अहमदनगर येथे पार पडल्या. छत्रपती संभाजी नगर विभागातून ७० किलो वजन गटातून आलेला पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने ३ राऊंड खेळून फाइनल कुस्ती १०-० अश्या मोठ्या फरकाने विजय मिळवत राज्यात पुन्हा एकदा कुस्ती प्रकारात माजलगाव चा दबदबा कायम ठेवत सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला आहे.पैलवान सुमितकुमार सध्या माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिकत असून, रुस्तुम ए हिंद पै. अमोल बुचूडे कुस्ती केंद्र पुणे येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला पै. सुमीतकुमार याची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून उत्तरप्रदेश मेरठ येथे होणाऱ्या स्पर्धेत पुन्हा एकदा महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार आहे.तसेच महारष्ट्राला या राष्ट्रीय स्पर्धेत सुमितकुमार राज्याला सुवर्णपदक मिळून देणार का, याकडे आत्ता सर्वांचे लक्ष वेधले आहे. तसेच, या अभूतपूर्व यशाबद्दल पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने सुवर्णपदक जिंकून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्याने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे पान २ वर...

# केज मतदार संघात प्रश्नांचा भडीमार!

**पडघम:** मूलभूत सुविधांपासून नागरिक वंचित




रत्नदीप सरवदे/अंबाजोगाई

गेल्या ४० वर्षापासून केज मतदारसंघ हा मागासवर्गीयांसाठी राखीव मतदारसंघ म्हणून आहे गेल्या ४० वर्षांपैकी साधारणपणे मुंदडा घराण्याकडे २५ ते ३० वर्ष एक हाती सत्ता राहिलेली आहे इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये सत्ता राहूनही केज मतदार संघ विकास शून्य दिसत आहे एकाच घरामध्ये २५ ते ३० वर्षे सत्ता असतानाही केज मतदार संघामध्ये विकासाचा कायापालट झाला असता मात्र विद्यमान आमदार आणि स्वर्गीय विमलताई मुंदडा यांनी केवळ आणि केवळ केज मतदार संघ राजकीय स्वार्थापोटी काही प्रमाणामध्ये व्यापारी गुत्तेदार भांडवलशाही अश्या लोकांना सांभाळून गेल्या २५ते ३० वर्षापासून एक हाती सत्ता मिळवली आहे आज गेल्या ३० वर्षापासून सत्ता असतानाही येथील मागासवर्गीय लोकांचे किंबहुना काही प्रमाणात ही प्रश्न सुटलेली दिसत नाहीत मतदारसंघ राखीव असताना जर मागासवर्गीयांचेच प्रश्न सुटत नसतील तर अशा लोकप्रतिनिधींना संधीही केवळ आणि केवळ भांडवलशाही म्हणून दिली जात आहे आणि भाडवलातून सत्ता आणि सत्तेतून भांडवल असे गणित घडत गेलेले दिसत आहे

केज मतदार संघामध्ये राखीव मतदारसंघ असल्यामुळे सर्वात जास्त प्रमाणामध्ये निधीही खेचून आणता येतो आणि आणला ही जाऊ शकतो मात्र येथील मागासवर्गीय लोकांचे जीवनमान कशा आणि कोणत्या प्रकारे सर्व सोई युक्त उंचावेल अशा पद्धतीने या ठिकाणी स्थानिक आमदारांनी काम करावयास पाहिजे होती, मात्र येथे स्थानिक आमदाराने त्याच्या पूर्ण दहा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये एक ही प्रश्न विधानसभेमध्ये मागासवर्गीय लोकांचा प्रश्न मांडला नाही केवळ भांडवलशाहीच्या जोरावरती केज मतदार संघामध्ये मुंदडा घराण्याचे अस्तित्व टिकून आहे केज मतदार संघामध्ये स्थानिक पातळीवरती रमाई घरकुल आवास योजना ही प्रभावि पने राबवण्यासाठी स्थानिक आमदाराने लक्ष देणे हे गरजेचे होते मात्र आमदार हा कोणाचा आहे येथे स्थानिक मागासवर्गीय लोकांना प्रश्न पडलेला होता रमाई घरकुल आवास योजना मतदारसंघांमध्ये राबवत असताना पीटीआर नावे नाहीत काही जागा भोगवट आहेत तर काही जागा गावठाण म्हणून आहेत हा सर्व प्रश्न आमदार महोदय यांना माहिती असतानाही त्यांनी याचा कधीही गट विकास अधिकारी यांच्या सोबत मिटींग घेऊन प्रश्न सोडावा असे वाटले नाही किंबहुना सोबत एक चर्चाही केली नाही आणि त्यांना चर्चा करावा अशी वाटलेली नाहीये कारण केज मतदार संघाचे आमदार हे भांडवलशाही यांनी खूप मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांना रमाई घरकुल आवास योजनेचा प्रश्न हा महत्त्वाचा वाटलेला नाही रमाई घरकुल आवास योजना केज् मतदारसंघांमध्ये राबवत असताना पान २ वर...

# वैद्यकीय क्षेत्र हेच अंतिम ध्येय ठेवू नका

**डॉ.नंदकुमार उघाडे:** श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूलमध्ये मार्गदर्शन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आपल्या देशातील बहुतांश हुशार विद्यार्थ्यांचा कल फक्त वैद्यकीय क्षेत्राकडे असल्याचे दिसून येते , साहित्य , अभियांत्रिकी , पत्रकारिता , संशोधन असे अनेक क्षेत्र आहे ज्यामध्ये तुम्ही तुमचे करिअर चांगले करू शकता. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातील बहुतांश हुशारी विद्यार्थी पत्रकारिता आणि संशोधन या क्षेत्राकडे वळतात म्हणूनच अमेरिकेची प्रगती झपाट्याने झाली आहे. आपला सर्वांगीण विकास घडवून आणत असताना देशाचा विकास कसा साध्य होईल याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे . असे प्रतिपादन विविध स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके लिहिणारे लेखक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. नंदकुमार उघाडे यांनी केले. पिंपरगव्हाण रोड , बीड येथील श्री . श्री . रविशंकर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. नंदकुमार उघाडे बोलत होते. पुढे बोलताना डॉ. उघाडे म्हणाले की , शाळा ही एक पवित्र संस्था असते तेथे विद्यार्थ्यांची मने सुसंस्कृत करण्याचे



कार्य शिक्षक करत असतात . शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे चारित्र्य चांगले घडते , त्याची क्षमता वाढते आणि त्याच्या आयुष्याला आकार येतो. काहीतरी करून दाखवण्याची महत्वाकांक्षा सदैव आपल्या मनात असली पाहिजे . प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ध्येय , उद्दिष्ट मोठे ठेवून ते मिळवण्याचा दृढ संकल्प केला पाहिजे. सतत आपल्या बुद्धीचा विकास करत राहणे हे विद्यार्थ्यांचे ध्येय असावे. इयत्ता आठवी पासूनच योग्य मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वाटचाल ठेवली तर यूपीएससी , एमपीएससी तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये पहिल्याच प्रयत्नात तुम्ही यश मिळवून जिल्हाधिकारी , एसपी , तहसीलदार असे मनाचे व महत्त्वाचे पद मिळवून देशाची सेवा करू शकता. यासाठी अभ्यासातील सातत्य कायम ठेवणे महत्त्वाचे आहे . असेही डॉ. उघाडे म्हणाले. या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या सूर्यवंशी मॅडम यांनी डॉ . नंदकुमार उघाडे यांचा सत्कार केला. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक सुहास सोनवणे यांनी केले.

# वाढदिवसाच्या खर्चाला दिला फाटा

**डॉ.यशवंत राजेभोसले:** गरजवंत कुटुंबांना किराणा वाटप



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

वाढदिवसानिमित्त कसलाही डामडौल न करता खर्चाला फाटा देत माजलगाव येथील नगर परिषद चे कर्मचारी आरेफ पटेल यांचा मुलगा मारुफ याचा जन्मदिन शहरातील, इंदिरा नगर, फातेमा नगर, अरफात मोहल्ला या भागातिल तब्बल १०० कुटुंबांना किराणा किटचे माजलगाव येथील डॉ. यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते वाटप करुन साजरा केला. त्यामुळे माणुसकीचे मुल्य संर्वधित झाले असून आरेफ पटेल यांचे कौतुक होत आहे.

माजलगाव शहरातील इंदिरा नगर,फात्तेमा नगर,आरफात मोहल्ला,येथे आयोजित वाढदिवस कार्यक्रमास डॉ.यशवंत राजेभोसले पत्रकार बाळासाहेब आडागळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष गायकवाड, अविनाश गायकवाड, आदित्य डावरे, राहुल धायजे, हमीद लाला, फैजल सय्यद आदी उपस्थित होते.या वेळी प्रत्येक पाहुण्यांनी प्रत्येकाने आपल्या वाढदिवसाच्या गोरगरीब मुलांसाठी खर्च करावा, गरजूवंत कुटुंबाला मदतीचा हात द्यावा. महाराष्ट्राची आदर्श संस्कृती दाखवून द्यावी असे मत सर्व प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.

# पत्रकारला संरक्षण देण्यासाठी ले पत्र!

## रोहन गलांडेंच्या जिवीताला धोका

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



बीडजिल्हाचे खासदार बजरंग सोनवणे खासदार असुन सुद्धा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभाला धंका लागु नये यांची सुध्दा काळजी खासदार बजरंग सोनवणे घेत आहेत या विषयी सविस्तर वृत्त असे की रोहन गलांडे एक मराठा असल्यामुळे व मराठा आरक्षणात सक्रीय असल्याने मराठा समाजातील मुंदडा यांच्या कार्यकर्त्यांनी व मुंदडाच्या कार्यकर्ते जरांगे पाटील समर्थक पत्रकार रोहन गलांडे यांना मागिल दोन चार दीवसापुर्वी जिवे मारण्यांची धमकी देण्यात आली होती कारण पत्रकार रोहन गलांडे पाटील यांची परखड लेखनी विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांना जाचक वाटत आहे व त्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांन कडुन रोहन गलांडे यांना धमकावून जिवे मारण्यांची धमकी दिली आहे तरी पत्रकार रोहन गलांडे पाटील यांना केज अंबाजोगाई मतदार संघाचे आमदार नमीता पान २ वर...

# आशियाई मिनी गोल्फ स्पर्धा

**क्रीडा:** 'एमआयटी एडीटी'च्या प्रांजली सुरदुसेला कांस्य

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी




चांगाई (थायलंड) येथे नुकत्याच पार पडलेल्या आशियाई मिनी गोल्फ स्पर्धेत एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बायोइंजिनिअरिंगची विद्यार्थिनी प्रांजली विनोद सुरदुसे हिने सांघिक गटात भारताचे प्रतिनिधित्व करताना कांस्य पदकाला गवसणी घातली आहे.

या स्पर्धेत भारताच्या मुले व मुलींच्या संघांनी चमकदार कामगिरी केली. मुलींच्या संघात प्रांजलीसह रिचा पान २ वर...

# जखमी झालेल्या शेतकऱ्याचा मृत्यू

**दुःखद :** निंबायती येथील घटना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी



शेतातून जनावरांचा चारा व शेती माल बैल गाडीने घरी आणत असताना बैलगाडी पलटी होऊन दबलेल्या शेतकऱ्याचा मंगळवारी(दि.१५) रात्री अकरा वाजता उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे

अशोक शामराव शिंदे(वय ५५) रा निंबायती असे मृत झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे निंबायती शिवारात असलेल्या त्यांच्या शेतातून हा शेतकरी जनावरांना चारा व शेतीमाल बैलगाडी मध्ये भरून (दि.९) बुधवार सायंकाळी घरी येत असताना त्यांची बैलगाडी पलटी झाली या घटनेत शेतकरी अशोक शामराव शिंदे हे बैलगाडी खाली दबून गंभीर जखमी झाले होते त्यांना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात पान २ वर...

## पत्रकार परिषद | जिल्हाधिकारी अविनाश पाठक

# सर्व मतदारांनी मताचा हक्क बजवावा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रातील संपूर्ण मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन बीडचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मतदारांना केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत श्री.पाठक बोलत होते. यावेळी पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, बीड विधानसभा क्षेत्राच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांची उपस्थिती होती.



### असा आहे निवडणूक कार्यक्रम

निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक - २२ ऑक्टोबर २०२४ नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दनांक- २९ ऑक्टोबर २०२४नामनिर्देशन पत्रांची छाननी- ३० ऑक्टोबर २०२४उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिनांक- ४ नोव्हेंबर २०२४प्रत्यक्ष मतदानाचा दिनांक- २० नोव्हेंबर २०२४मतमोजणी दिनांक- २३ नोव्हेंबर २०२४निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा दिनांक- २५ नोव्हेंबर २०२४

शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा २०२४ साठी निवडणूक कार्यक्रम (ता.१५) घोषित केला आहे. घोषित केल्यापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. जिल्ह्यात गेवराई, माजलगाव, बीड, आष्टी, केज व परळी अशी सहा विधानसभा मतदार संघ आहेत. या सहाही मतदार संघात एकूण २१ लक्ष ९७ हजार ८३० मतदार आहेत. त्यामध्ये १५ लक्ष ५८ हजार ९९८ पुरूष, १० लक्ष ३८ हजार ८०९ पान २ वर...

# हडपसर विधान सभेसाठी मैदानात

**पडघम:** हाजी उस्मान तांबोळी म्हणाले संधी मिळावी

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे त्यामुळे सर्वच पक्षातील उमेदवार निवडणूकीसाठी सज्ज झाले आहेत. पुण्यातील हडपसर विधानसभेसाठी काँग्रेस पक्षाचे पुणे शहर उपाध्यक्ष हाजी उस्मान तांबोळी यांनी पक्षाकडे उमेदवारी साठी मागणी केली आहे. गेली चाळीस वर्षांपासून काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय राहुन पक्ष वाढीसाठी पक्षाचा विचार लोकांच्या घराघरापर्यंत पोहोचवण्यासाठी तांबोळी यांनी योगदान दिले आहे.



नऊ वर्षापासून काँग्रेस पुणे शहर उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या उस्मान तांबोळी यांचे सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान आहे. महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन, वंचित घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम घेऊन त्यांना योग्य न्याय देण्याची भूमिका आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी, जेष्ठ नागरिकांनासाठी नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप, निराधार व अपंग गरजू महिलांना मदत व साहित्य वाटप असे सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात याची पोहच पावती म्हणून पक्षाचे विधानसभचे तिकीट द्यावे अशी भावना तांबोळी यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रात ११ टक्के मुस्लिम लोकसंख्या असूनही, गेल्या चार ते पाच लोकसभा निवडणुकीत फक्त एक मुस्लिम उमेदवार उभा करण्यात आला आहे. धुळे, मालेगाव, भिवंडी, अकोला, औरंगाबाद आणि नांदेड यांसारख्या मुस्लिमबहुल मतदारसंघांमध्ये अनेकदा मुस्लिम प्रतिनिधित्वाचा अभाव असतो. भेदभाव करणारे कायदे आणि मुस्लिमांविरुद्ध मॉब लिंचिंगच्या वाढत्या घटनांमुळे मुस्लिम समुदायांमध्ये अधिक राजकीय जागरूकता आणण्याची गरज आहे. पान २ वर...